# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

मंगळवार, १८ जून २०२४

⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)

⊙ मराठी ⊙ दैनिक

⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - २८५

⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) TUESDAY 18 JUNE 2024 | adhunikkesari.com | ●YEAR-03 ●ISSUE-285 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-12 ●PRICE-05


## छत्रपती शिवाजी महाराजांची वाघनखे लवकरच भारतात

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** हिंदवी स्वराज्याच्या सातारा या चौथ्या राजधानीतील छत्रपती शिवाजीमहाराज प्राचीन वस्तू संग्रहालयामध्ये येत्या जुलैच्या दुसऱ्या आठवड्यात शिवाजीमहाराजांनी शौर्य दाखवले ती वाघनखे इंग्लंडच्या म्युझियममधून आणण्यात येणार आहेत. सातारच्या या वस्तू संग्रहालयात ही वाघनखे लोकांना पहायाला ठेण्यासाठी विशेष दालन सज्ज झाले आहे. जनतेच्या भावना जोडलेल्या हा ऐतिहासिक अनमोल ठेवा सलग १० महिने पहाण्यास उपलब्ध राहणार असून, त्याचे इतिहास संशोधक व शिवप्रेमींमध्ये अप्रूप राहणार आहे. ग्रील दरवाजा व सेंसर यासह सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या नजरा अशी वाघनख्याची चोख सुरक्षा व्यवस्था संग्रहालयाचे अधीक्षक प्रवीण शिंदे यांनी केलेली आहे.ही वाघनखे ज्या म्युझियममध्ये आहेत. त्यांचे अधिकारी लवकरच ती घेवून येण्याची शक्यता आहे. परंतु, ती कशी येतील किंवा काय हे गोपनीय असल्याचे प्रवीण शिंदे यांनी लोकसत्ताशी बोलताना सांगितले. राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकाराने व विशेष प्रयत्नांतून छत्रपती शिवरायांचे हे खास शस्त्र पुन्हा मायदेशी येणार आहे. त्यासाठी मंत्री मुनगंटीवार यांच्यासह सांस्कृतिक कार्य विभागाचे प्रधान सचिव, संचालक, पुरातत्व आणि संग्रहालय संचालनालयाच्या शिष्टमंडळाने लंडनमधील व्हिक्टोरिया आणि अल्बर्ट संग्रहालय तसेच इतर संग्रहालयांना भेटी दिल्या होत्या. आणि शिवरायांची ही शौर्य, पराक्रमांनी गाजलेली वाघनखे भारतात आणण्याचा करार केला होता.

इंग्लंडमधील व्हिक्टोरिया आणि अल्बर्ट म्युझियममध्ये शिवरायांची म्हणून असलेली ही वाघनखे छत्रपतींनी अफजलखान वधावेळी वापरलेली असल्याचा तज्ज्ञांचा दावा आहे. पोलादीपट्टीवर पाच इंच अंतर व चार सव्वा इंच लांबीचे तीक्ष्ण वाघनखे व त्याला तिन्ही बाजूने शिरा, खालच्या बाजूला धार असलेले दोन्ही बाजूच्या अंगठ्या असणारी ही वाघनखे सध्या इंग्लंडच्या म्युझियममध्ये असून छत्रपती शिवाजी महाराजांनी त्याचा वापर केला होता. असे इतिहास तज्ज्ञांचे मत आहे. ती वाघनखे या म्युझियमला मराठ्यांचा इतिहासकार ग्रँट डफ यांचा वंशज अँड्रियन ग्रँट डफ यांच्याकडून भेट म्हणून मिळाल्याचे सांगितले जात आहे.

## आमचे आरक्षण वाचले पाहिजे : हाके

### लेखी आश्वासन मिळाल्याशिवाय माघार नाही

आधुनिक केसरी न्यूज

**वडीगोद्री : शिष्टमंडळाला विनंती आहे की, आमच्या ओबीसींमध्ये चिंतेची भावना आहे. आम्हाला शासनाकडून एक पत्र हवे आहे की, ओबीसी आरक्षणाला कसा धक्का लागत नाही, त्याबद्दल माहिती हवी आहे. आम्ही कुणावरही क्लेम करत नाही फक्त आमचे आरक्षण वाचले पाहिजे. आमचे शिष्टमंडळ उद्या मुंबईला जाणार आहे, मात्र लेखी आश्वासन मिळाल्याशिवाय आम्ही उपोषण मागे घेणार नाही, असे ओबीसींच्या आरक्षणासाठी उपोषणाला बसलेले प्रा. लक्ष्मण हाके यांनी म्हटले आहे.**

सरकारच्या आश्वासनानंतर मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी आपले उपोषण मागे घेतले. मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण मिळावे, अशी त्यांची मागणी आहे. दुसरीकडे पाच दिवसांपूर्वी ओबीसी आरक्षणाला धक्का लागणार नाही, हे सरकारने लेखी द्यावे, या मागणीसाठी लक्ष्मण हाके आणि त्यांचे सहकारी नवनाथ वाघमारे हे उपोषणाला बसले आहेत. त्यांच्या उपोषणाचा सोमवारचा पाचवा दिवस आहे. दरम्यान सोमवारी त्यांची सरकारच्या शिष्टमंडळाने भेट घेतली. या शिष्टमंडळामध्ये सहकार मंत्री अतुल सावे, खासदार संदीपान भुमरे आणि माजी केंद्रीय मंत्री डॉ. भागवत कराड यांचा समावेश होता. दरम्यान शिष्टमंडळाशी चर्चा केल्यानंतर आता प्रा. लक्ष्मण हाके यांनी माध्यमांशी संवाद साधला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री यांच्या आदेशानुसार आम्ही इथे आलो आहोत. आपल्यावर कुठलाही अन्याय होणार नाही, ओबीसीच्या आरक्षणाला धक्का लागणार नाही. आम्ही उद्या सकारात्मक चर्चा करून ओबीसींना कसा न्याय देता येईल यासाठी प्रयत्न करू. मात्र हाके जर चर्चेला आले तर उत्तम होईल. आमची विनंती आहे की, हाके यांनी स्वतः चर्चेसाठी यावे, असे यावेळी खा. भुमरे यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.



### चर्चेतील बातमी

## रेल्वे गाड्यांची धडक; १५ प्रवाशी ठार

आधुनिक केसरी न्यूज

**सिलीगुडी :** पश्चिम बंगालच्या सिलीगुडीमध्ये सोमवारी सियालदहला जाणाऱ्या कंचनजंगा एक्स्प्रेसला मालगाडीची धडक लागल्याने मोठा अपघात घडला आहे. या अपघातात १५ जण ठार झाले असून ६० जण जखमी असल्याचे वृत्त आहे. याबाबत रेल्वे बोर्डाचे अध्यक्ष आणि सीईओ जया वर्मा सिन्हा यांनी प्राथमिक निष्कर्ष काढला आहे. जया वर्मा म्हणाल्या, प्राथमिक निष्कर्षानुसार मानवी चुका समोर आल्या आहेत. मालगाडीच्या चालकाने सिग्नलकडे दुर्लक्ष केल्याने हा अपघात घडला. सकाळी ८.५५ वाजता हा भीषण अपघात झाला. या अपघातानंतर तत्काळ बचावकार्य सुरू करण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले. मालगाडी अगरतलावरून सियालदाह येथे जात होती. यावेळी या मालगाडीने न्यू जलपाईगुडी येथे रुळावर उभ्या असलेल्या कंचनजंगा एक्सप्रेसला जोरदार धडक दिली. ही धडकी इतकी जोरदार होती, की यावेळी कंचनजंगा एक्सप्रेसलाचे दोन डबे थेट रुळावरून खाली घसरले. या ठिकाणी रेक्यू टीम दाखल झाली असून बचावकार्य सुरू झाले आहे. महत्त्वाचे म्हणजे रेल्वेमंत्री अश्विनीवैष्णव देखील घटनास्थळी दाखल झाले आहेत. त्यांनी मृतकांच्या कुटुंबियांना १० लाख रुपयांची आर्थिक मदत देणार असल्याचे जाहीर केले आहे.

## देशात जाती जनगणना करण्यात यावी : छगन भुजबळांची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** देशात जातीनिहाय जनगणना करण्यात यावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते छगन भुजबळ यांनी केली आहे. तसेच ही जनगणना झाली तर याचा देशातील ओबीसींना मोठा फायदा होईल आणि त्यांना केंद्रातून मोठ्या प्रमाणात निधी मिळेल, असेही ते म्हणाले. सोमवारी झालेल्या समता परिषदेच्या बैठकीनंतर माध्यमांशी बोलताना छगन भुजबळ यांनी यासंदर्भात प्रतिक्रिया दिली.नरेंद्र मोदी तिसऱ्यांदा देशाचे पंतप्रधान झाले आहेत. आता आम्ही त्यांच्याकडे मागणी करणार



आहोत की त्यांनी जातीनिहाय जनगणना करावी. ती केली तर ओबीसींच्या विविध मुद्द्यांवर प्रकाश पडेल. नुसतीच लोकसंख्या समजणार नाही तर ओबीसींची परिस्थितीदेखील आपल्याला समजेल. त्यामुळे केंद्र सरकारकडून मिळणारा निधी, जो आता केवळ अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींना मिळतोय तो ओबीसींना देखील मिळू शकेल. परंतु, त्यासाठी जनगणना व्हायला हवी, अशी प्रतिक्रिया छगन भुजबळ यांनी दिली. जाती जनगणना केवळ राज्यपातळीवर करून फायदा होणार नाही. तर ती देशपातळीवर करावी लागेल. केवळ राज्याच्या पातळीवर ही जनगणना झाली तर आपल्याला फक्त माहिती मिळेल. परंतु, केंद्राचा निधी मिळणार नाही. त्यामुळे केंद्राकडून निधी कशाप्रकारे मिळवता येईल याबाबत आज समता परिषदेच्या बैठकीत चर्चा झाली, असेही त्यांनी सांगितले. तसेच केंद्र सरकारने जाती जनगणना करण्याचा निर्णय घेतला तर त्याचा आम्हाला आनंद होईल, त्यामुळे प्रत्येक समाजाची योग्य संख्या समजणे सोपे जाईल, अशी प्रतिक्रियाही त्यांनी दिली. पुढे बोलताना त्यांनी ओबीसी नेत्यांकडून सुरु असलेल्या उपोषणावरही भाष्य केले. राज्यात काही लोक ओबीसींसाठी उपोषणाला बसले आहेत. आम्ही त्यांना माघार घेण्याची विनंती केली आहे. येत्या दोन दिवसांत आम्ही वकिलांशी बोलणार आहोत. काही कागदपत्रेदेखील आम्ही तयार केली आहेत. जर कुठं ओबीसींवर अन्याय होत असेल तर आम्ही त्यासंदर्भात योग्य ती पावले उचलू, असेही ते म्हणाले.

**तर मी स्वत : आंदोलन करेन :** दरम्यान, सरकार आमचे ऐकत नाही, अशी तक्रार काही ओबीसी नेत्यांनी छगन भुजबळ यांच्याकडे केली होती . यासंदर्भात बोलताना, मला आधी माहिती घेऊ द्या, त्यानंतर आपण आपल्या मागण्या सरकारकडे मांडू, त्यानंतरही सरकारने ऐकले नाही, तर मी स्वत : आंदोलन करेन, असेही भुजबळ यांनी सांगितले .

## पाऊस गेला तरी कुठे ? बळीराजा पेरणीच्या प्रतीक्षेत

### कंधार तालुक्यात पाऊस लांबल्याने पेरण्या खोळंबल्या !

आधुनिक केसरी न्यूज

**धोंडीबा मुंडे**

**कंधार :** ढगाची गर्दी पण पावसाचा पत्ताच नाही, हवामान खात्याने गेल्यावर्षीपेक्षा यावर्षी समाधानकारक पाऊस पडणार असून वर्तविलेल्या अंदाजानुसार मृग नक्षत्रामध्ये तालुक्यात पाऊस पडलाच नाही. पेरणीयोग्य पाऊस न पडल्याने खरीप हंगामाच्या पेरण्या खोळंबल्या आहेत.


काही शेतकऱ्यांनी कापसाची लागवड केली असून या पिकाला विहिर, बोअर व ठिबक संचाद्वारे पाणी दिले जात आहे. कंधार तालुका हा कृषी प्रधान असून खरीप हंगामातील शेतीचे उत्पन्न हेच अधिकांश शेतकऱ्यांचे शाश्वत उत्पन्न आहे. तालुक्यातील अधिकांश भाग डोंगराळ असून जमीन हलकी व भुसभुशीत आहे.

या तालुक्यांत ६८ हजार ३०० हेक्टर जमीन लागवडी लायक आहे. यात प्रामुख्याने ज्वारी, कापूस, हाळद, सोयाबीन, सूर्यफूल, तीळ, तूर, मूग, उडीद आदी पिके घेतली जातात. तालुक्याचे सरासरी वार्षिक पर्जन्यमान ८९० मिमी आहे. मृग नक्षत्राचे आगमन होवून १० दिवस लोटले तरी अजून सध्या पेरणी कशी करायची ? असा प्रश्न शेतकऱ्यांना पडला आहे.

पाऊस कधी पडेल पेरण्या कधी सुरू होतील. यासाठी बळीराजा आभाळाकडे डोळे लावून बसला असून 'येरे... येरे पावसा... ! तुला देतो पैसा...! पैसे झाला खोटा...! आडत सावकार झाला मोठा' असे म्हणण्याची वेळ बळीराजावर आली आहे,जमिनीत पुरेशी ओल नाही.कृषी दुकानदारांनी खते बियाणांचा मोठा साठा आपापल्या दुकानात करून ठेवल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. गेल्या १० वर्षापासून तालुक्यात सोयाबीन पिकावर भर दिला जात आहे. कमी कालावधी, कमी पावसात, कमी मेहनतीत हे पीक येत असल्याने त्याला पसंती मिळत आहे. दुपारनंतर नियमितपणे आभाळ भरून येत आहे,आकाशात ढग जमा होतात. वादळ वारा येतो आणि ढग निघून जातात. बळीराजा आकाशाकडे पाऊस पडण्याच्या अपेक्षेने बघतच राहतो, मात्र पाऊस पडतच नाही.असे ८-१० दिवसांपासून शेतकरी वर्ग अनुभवत आहेत. गतवर्षीचा शेतक-याचा शेतीमाल घरात आहे, अशा परिस्थितीमध्ये देखील कर्ज काढून शेतकरी खते बी-बियाणे घरी नेऊन ठेवत आहे. मात्र वेळेवर पेरणी नाही झाली तर याचा फटका उत्पादनावर होणार हे नक्की आहे.



कंधार कृषी विभागातर्फे वारंवार सुचना देऊनही शेतकरी घाईगडबडीने पेरणी करीत आहेत .मात्र, बऱ्याच वेळा पावसाने अचानक दडी मारल्यामुळे शेतकऱ्यांना याचा मोठा फटका बसु शकतो . दुबार पेरणीची वेळ येऊ शकते . त्यामुळे जमिनीत किमान ७ इंच खोलीपर्यंत ओलावा आणि १०० मिलोमीटर पाऊस झाल्याशिवाय पेरणी करू नये,असे आवाहन कंधार तालुका कृषी विभागाकडून करण्यात आले आहे .




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# चांदणे शब्दफुलांचे...

आधुनिक केसरी

त्या शिकवणुकीत, त्या चरित्रात शिवाजी जन्माला घालण्याची ताकद आहे. अशीच गायकी बालगंधर्वांची ! पुलंनी त्यांच्यावर लिहिलेला हा लेख संगीताची साधना करू पाहणाऱ्या नवगायकांना सुद्धा मार्गदर्शक ठरेल असाच आहे. याच लेखात पुलं पुढे म्हणतात, ' मी सुदैवाने अनेक तोलामोलाचे गायक ऐकले आहेत. प्रत्येकाचे गाणे ऐकताना मला सतत एक वाटत आले आहे. ते हे की हे कलावंत आपल्या गाण्यातून काहीतरी सिद्ध करायला बसतात. कुणी लयकारीवरची हुकूमत दाखवतो, कुणी चीज आणि राग यांचे शुद्धत्व जपल्याच्या तोऱ्यात असतो. कुणी आपल्या घराण्यातले जडजवाहीर पुढे ठेवून श्रेष्ठत्व सिद्ध करू पाहतो. कुणी रियाझाचे आपण किती प्रचंड डोंगर उपसले आहेत ते पहा असे ध्वनित करत असतो, कुणी आपल्या गळ्यातून सुरावलीच्या फुलबाज्या उडवून दिपवत असतो - कुणी काही,कुणी काही. पण प्रत्येक जण अधूनमधून का होईना काही तरी गाण्यातले किंवा गाण्याबाहेरचेही सिद्ध करू पाहत असतो, मैफिल यशस्वी करण्याची जिद्द असते. कुणावर तरी मात करण्याची ईर्षा दिसते. ' यातच बालगंधर्वांबद्दल बोलताना पुलं पुढे म्हणतात, ' बालगंधर्वांचे गाणे ऐकताना मात्र मला सतत एक गोष्ट जाणवत आली आहे, ती म्हणजे ते फक्त गायला बसत. यापलीकडे काहीही सिद्ध करायला बसत नसत. चारी दिशांच्या पाखरांनी एखाद्या वृक्षावर भूरूभरू येऊन बसावे तशी ती सुरांची पाखरे त्यांच्या हृद-कदंबावर येऊन बसत आणि गाणे सुरु होई. गाणारा देह हे केवळ एक साधन. त्या गाण्यातून त्यांना घराणे वगैरे काहीही सिद्ध करायचे नसे. येथे गाणाराच गाणे होऊन जायचा. त्या गाण्याला म्हटले तर परंपरा होती, म्हटले तर नव्हती. ' बालगंधर्वांच्या गायकीबद्दल बोलताना पुलं पुढे म्हणतात, ' ज्यांना त्या गाण्याच्या मोठेपणाची खूण पटली त्यांनी मात्र घराण्याबिराण्याचा अहंकार बाजूला सारून ती गाणीच नव्हे तर गायकीही स्वीकारली. अल्लादियाँ खां साहेबांचे चिरंजीव मरहूम मंजीखांसाहेब, बालगंधर्वांची पदे गाताना अंत्रोळी घराण्याची चीज गायल्यासारखेच रमून जात. आग्रेवाले निसारहुसेनखां ' भूषण संसारा ' फार मजेत गात असत. अहमदजान थिरकवाँ खांसाहेबांसारखे तबला नवाज नारायणरावांचे ' मम सुखाची ठेव ' सुरु झाल्यावर स्वतःलाच सुखाची ठेव सापडल्यासारखे त्या रूपकात एकरूप व्हायचे.



## गोरक्षनाथ

आधुनिक केसरी

एवढ्याशा पात्रातली भिक्षा तीघांना (मच्छिंद्र, गोरक्ष आणि मीननाथ) कशी पुरणार अशी काळजी वाटून तीने आपल्या दासींना त्या पात्रात




भरपूर भिक्षा वाढण्यास सांगितले. आश्चर्याची गोष्ट म्हणजे जेवढी भिक्षा घालावी तेवढे ते पात्र मोठे मोठे होत होते. अगदी मारूतीच्या शेपटासारखे. शेवटी राणी अहंकार सोडून मनातल्यामनात मच्छिंद्रनाथांना शरण गेली. तक्षणी पात्र पूर्ण भरले आणि परत अवकाशमार्गाने गोरक्षनाथांकडे निघाले. वाटेत एका पर्वतावर अत्रिपुत्र दत्तात्रेय बसले होते. त्यांनी आकाशमार्गाने उडत जाणारे हे भिक्षापात्र पाहिले. त्यांना विस्मय वाटला. हे कोणाचे पात्र आहे ते विचारावे या हेतूने त्यांनी हातातला दंड वर केला. पात्र घेवून जाणारी सिद्धी त्या दंडाला आपटून खाली पडली. दतात्रेयांनी तीला ठावठिकाणा विचारला आणि पुढे जाण्याची अनुमती दिली. सिद्धी भिक्षापात्रासह गोरक्षांनाथांकडे पोहोचली आणि म्लान वदनाने उभी राहिली. गोरक्षनाथांनी तीला उशीर होण्याचे कारणं विचारले. सिद्धीने झालेला सर्व प्रकार कथन केला. आपल्या सिद्धीला कोणी गोसाव्याने दंड मारून पाडले हे एकून गोरक्षनाथांचा क्रोध अनावर झाला.

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

गति विहंग न्यारा चले,
प्रकृति अल्प भू ज्ञान ।
निराधार वे ऊड़ता, ज्यों जग में व्योमयान
।।१०।।(स्वर्वेद प्रथम मण्डल चतुर्थ अध्याय) ०१/०४/१०

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
विहंगम योगी प्राकृतीक ज्ञानाचे भान ठेऊन त्याच्यापुढे निराधार गतीने आकाशात (चेतन मंडलात) गमन करतात. ज्याप्रमाणे पृथ्वी-मण्डलाचे भान ठेऊन निराधार व्योमयान (विमान) आकाशात उडते. विहंगम योगात प्रकृतीमंडलाच्या ज्ञानाचे भान ठेऊन आपल्या मंडलांतर्गत चेतन सुरति निराधार होऊन आकाश-गमन करते.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सॲप करा ८५५४८८३१६६.



आधुनिक केसरी

## अवघे चराचर | विठुमय ||

आषाढी वारीची | आस मनी दाटे ||
पंढरीच्या वाटे | सुख भारी ||१||
पुंडलीका तुझे | थोर उपकार ||
केलेस साकार | परब्रह्म ||२||
राम कृष्ण हरि | तुकोबाचा मंत्र ||
सांगितले तंत्र | जगण्याचे ||३||
टाळ-मृदुंगाचा | नादमय सूर ||
चैतन्य बहर | मोगऱ्याचा ||४||
विठ्ठल विठ्ठल | मुखी नाम बोले ||
परावाणी डोले | अंतरात ||५||




प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## हितगुज



पुष्प ९२वे



**गुरुमाऊली परमपूज्य अण्णासाहेब मोरे, दिंडोरी (नाशिक)**

### श्रुतं मे गोपाय! त्राहि माम्!!'


या प्रार्थना-वाक्याचा अर्थ आहे - 'निष्कलंक, दिव्य, पवित्र, सरस अशा विद्येचा आम्हाला कधी ही विसर न पडो. माणसाच्या प्रतिभेवर चढलेली काजळी निघून या विद्येद्वारे आमचे कल्याण होवो.'
नराला नारायण बनवणाऱ्या 14 विद्या, 64 कला या भारतात होत्या. वेद-वेदांगांची श्रुति परंपरा होती. शाश्वत विद्येच्या आधाराने ईश्वराचा प्रत्यक्ष साक्षात्कार अनुभवणे, अखंड ब्रह्मानंदाच्या डोहात निमग्न राहून अद्वैतामृताचा आस्वाद घेणे, या भारतभूमीचे विलक्षण सामर्थ्य आहे. या सामर्थ्याची साधना व प्रचिती म्हणजे अध्यात्म होय. प्राचीन ऋषी, मुनींनी मनाची अफाट शक्ती जाणून घेऊन तिला ऊर्ध्व बनवून विश्वमंगल साकार करण्याची क्षमता माणसात निर्माण केली. त्यांनी सर्व जगाला मनाचे हे अलौकिक रूप उलगडून दाखवले. मन 'ज्योतिषां ज्योतिः' आहे. हेच मन शिवसंकल्पाने व्याप्त होत असते. 'मे मनः शिवसंकल्पमस्तु।' मानव-मन हे ज्ञान, प्रज्ञान दोन्हींचा आधार आहे. या मनाची सर्व कवाडे उघडून त्याला निर्मल, सतेज करून ईश्वराचे अनुसंधान करण्यासाठी सज्ज बनवायचे, या उद्देशाने धर्म, तत्त्वज्ञान, उपासना-पंथ, संस्कृती, नीति, व विविध ज्ञान-विज्ञानांचा आविष्कार झाला आहे. यातून सामाजिक भावजीवन सरस, शील संपन्न, उच्च अभिरूची संपन्न बनले. श्रद्धा, विश्वास, मूल्ये, नैतिक चारित्र्य यातून जीवनाचा आनंद वाढत गेला. अशा अवस्थेत मानव मनात स्फुरलेला विचार तत्त्वज्ञानाचा शाश्वत संदेश बनला, स्फुरलेला भाव ईश्वर-लीला बनून साकारला, स्फुरलेले शब्द मंत्र बनले, स्फुरलेल्या रेखाकृतितून यंत्रे, देवतांची अधिष्ठाने निर्माण झाली. या मनाच्या दिव्यतेतून माणसाने कणा-कणातले चैतन्य-स्पंदन अनुभवले. एवढी भव्य, उदात्त परंपरा, वारसा लाभूनही आज भारतीय माणूस दीन, दरिद्री, याचक का झाला आहे? त्याच्या जीवनातला खरा अर्थ व आनंद हरवला आहे. साच्यातल्या मूर्तीप्रमाणे एकामागे एक पिढ्या निर्माण होतात, संपतात. पण इतिहास झळाळून जावा, माणसाला दिव्यत्वाची सहज प्रचिती घेता यावी असे सुंदर, महन्, मंगल व्यक्तिमत्त्व माणसातून का आकारास येत नाही?
पूर्वीच्या काळी माणसाने जशी स्वतःच्या आयुष्याची पूर्ण कुंडली मांडून पूर्ण जीवनाचा पट ज्योतिष व सामुद्रिकाच्या द्वारे उलगडला तसा घर, मंदिर, राजगृह, रणक्षेत्र, शस्त्रागार, सभागृह, पाठशाला या सर्वांना ऊर्जा, तेज प्राप्त करून देणारे वास्तुशास्त्र निर्माण केले. त्यामुळे प्राचीन भारतीयांस आपली पर्णकुटी ही सुरक्षा स्थान, स्नेहाचे केंद्र, विश्रामाचे शांतिधाम वाटत होते. त्यात प्रवेश केल्यावर सर्व ताण-तणाव, चिंता संपून तो मुला-बाळांच्या किलबिलाटात, पशु-पक्ष्यांच्या उपस्थितीत, आई-वडिलांच्या आशीर्वादात नवे बळ, आनंद प्राप्त करीत असे.

**संकलन : बाजीराव सोनवणे, नाशिक**
**संपर्क क्र. ९९२२४२००३४**

# नाम घेण्याला काहीही आड येत नाही

आधुनिक केसरी

आपण असे पाहू की, नामात प्रेम येण्याकरता एक एक सत्कर्म करीत राहणे सुलभ, की ते नामच विचाराने, सर्व संतांनी कळवळ्याने सांगितले आहे म्हणून, जरूर तर बळजबरीनेसुद्धा घेत राहणे, हे सुलभ ? समजा एक यंत्र आहे, त्यात पुष्कळ चक्र आहेत, आणि ते यंत्र चालू करण्याचा हेतू धरला आहे. आता एखाद्याने त्यांतले एखादेच चक्र चालू करू म्हटले तर ते चालू होईलच असा भरवसा नाही. पण त्या सर्व चक्रांचा संबंध असणारी कळ आपण दाबली, तर मात्र बिनतक्रार आणि अत्यंत अल्प प्रयासाने ते यंत्र सहज चालू करता येईल. त्याप्रमाणे, नाम ही कळ जर धरली तर सत्कर्मरूपी सर्व चक्र एकदम फिरू लागून आपले काम निश्चीतपणे आणि सुलभपणे होईल. म्हणून, हमखास आणि सहज रीतीने काम व्हावे अशी ज्याची इच्छा असेल त्याने कशाही रीतीने का होईना नाम घ्यायला लागावे. नाम घ्यायचे एकदा पक्के ठरविले म्हणजे काहीही आड येत नाही. व्यवहारात आपण पाहतोच की, एखादी गोष्ट



समर्थनीय नसली तरी करायचा निश्चय केला की मनुष्य ती करतोच. मग नाम घेण्याचा जर निश्चय केला तर का नाही होणार ? काहीही केले तरी शेवटी नामाशिवाय गत्यंतर नाही; तर मग ते घेण्यात विलंब किंवा चालढकल करण्यात काय अर्थ आहे ? म्हणून, कोणत्याही तऱ्हेच्या शंका-कुशंका न घेता, कशाही तऱ्हेने पण नाम घेत राहावे हे उत्तम; म्हणजे विनाकारण काळ फुकट घालविला अशी पश्चात्तापाची पाळी येणार नाही. जग हे अनेक मोहक वस्तूंनी भरले आहे. त्या वस्तू आपण पाहिल्या किंवा नुसत्या ऐकल्या तरी हव्याशा वाटतात, आणि त्या मिळविण्याचा आपण प्रयत्न करतो. म्हणून देवाजवळ आपण अशी प्रार्थना करावी की, ' देवा, मोहक वस्तू मला दाखवूच नकोस, कारण माझी इच्छा तिकडे जाईल आणि मी फसेन. देवा, माझे ज्यात खरे हित आहे तेच मला दिसो, तेच मी ऐको, त्याचेच मला स्मरण होवो, आणि त्याचीच मला गोडी लागो. ' प्रह्लाद, द्रौपदी यांसारख्या भक्तांनी देवाजवळ काय मागितले ? तेच आपण मागावे, आणि त्यांनी निष्ठा ठेवली तशीच आपणही ठेवावी. त्यांच्या ठिकाणी जसे वैराग्य होते, तसे आपल्या ठिकाणी आणण्याचा प्रयत्न करावा. प्रयत्न करीत असताना प्रथम चुका होतील, पण त्या झाल्या तर पश्चात्ताप व्हावा. ' देवा, मी फार दोषी, अपराधी आहे, मला क्षमा कर आणि तुझ्या कृपेला पात्र कर.' पश्चात्ताप खराच झाला तर राम कृपा करीलच. मुखाने नाम घ्यावे, हाताने प्रपंचाचे काम करावे, आणि अंतःकरणात समाधान ठेवावे.

**१४. जो नाम घेऊ लागेल त्याचे मन बाहेर धावण्याचे हळूहळू कमी होते.**

## देहान्तनिरूपण

आधुनिक केसरी

सततच्या सत्कर्माने जीव तामसी बनत नाही. म्हणून आपली भारतीय संस्कृती सतत अभ्यासत रहा. तीचा प्रसार करा. अभ्यासाने सत्व



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

गुणांचा उत्कर्ष होऊन जीव वैराग्य संपन्न झाला की वासना क्षय पावते. एकदा का वासनेवर विजय मिळवला की आत्मज्ञान प्राप्त होते. वासना क्षय पावली म्हटल्यावर परत जन्म मृत्यू येत नाही. माणसाला दोन देह असतात एक सुक्ष्म देह व दुसरा स्थूल देह. यापैकी माणसांचा सुक्ष्म देह. वासना रूप असतो. वासना ही वायु रूपात असते. ती दिसत नाही पण तिचे अस्तित्व असते. स्थूल देह सूटला तरी वासना मात्र जशीच्या तशी शिल्लक रहाते. ती परत परत जन्म घ्यायला लावते. ती जाणीव रूप असल्याने मूळमाये पर्यंत पोहचवण्याचे काम करते. पाचही प्राण शरिरातील आपले स्थान सोडतात. तेव्हापासून वासना त्यांच्या मागोमाग जाते. प्राण वायू रूप असतो. वायू बरोबर वासना देह सोडते. ती वायू रूपात शिल्लक असल्याने आणि मरताना जशी हेतू असेल त्या परत जन्म घेते. काही लोकांनी परत परत जन्म घेतात.

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
मंगळवार, १८ जून २०२४
adhunikkesari.com

# माऊलींच्या वारीची ८४७ वर्षांची परंपरा

## जन्मभूमी आपेगावातून ज्ञानोबाच्या पालखीचे २८ जूनला प्रस्थान

आधुनिक केसरी न्यूज

**दादासाहेब घोडके**



**पैठण :** पंढरीची ही वारी तेराव्या शतकातील संत नामदेव, संत ज्ञानेश्वरांच्या अगोदरही होत असल्याचे दाखले मिळतात. मूळचे मराठवाड्यातील असलेल्या संत नामदेवांच्या घराण्यातही अनेक पिढ्यांची पंढरीची वारी होती. तर संत ज्ञानदेवांचे आजोबा त्र्यंबकपंतही आपेगाहुन पंढरीची वारी करत होते. पंढरीच्या या वारीला प्राचीन इतिहास आणि परंपरा आहे. वारीचा उल्लेख असलेले संत ज्ञानदेवकृत अभंगातून कागदोपत्री ठोस आधार मिळतो. संत ज्ञानदेवांच्या घरामध्ये पंढरीची वारी होती. या सर्व ठोस पुराव्यावरून आपेगाव ते पंढरीची वारी गेली हजार-बाराशे वर्षे अखंड सुरू असल्याचे स्पष्ट होते. उन्हाळा संपतो आण वारकर्यांना पंढरीची आस लागते, अभंग गात गात, खेळीमेळीने, आनंदाने, नाचत, गर्जत विठ्ठल नामाचा जयघोष करीत वारकरी ही पायी वाटचाल करतात. भजन गात, नाचत पंढरीकडे जाणाऱ्या वारकऱ्यांच्या या दिंड्या म्हणजे चैतन्याचा प्रवाह या दिंड्याचे दृश्यही चित्त प्रसन्न करणारे असते. आपेगाव ते पंढरपूर अशा पायी वारीला ८४७ वर्षांची अखंड परंपरा आहे. संत ज्ञानेश्वर महाराजांचे पणजोबा विठ्ठलभक्त त्र्यंबकपंत यांनी ती सुरू केली होती. त्र्यंबकपंतांना हरिहरपंत व गोविंदपंत अशी दोन मुले होती. त्यापैकी हरिहरपंतांनी राजनैतिक परंपरा जोपासत देवगिरीचे यादव राजेसिंघल यांच्या दरबारी सरसेनापती पद भूषविले, तर गोविंदपंत यांनी वडिलांच्या भक्ती - ज्ञानमार्ग उपासनेची परंपरा जोपासत ही पंढरपूरची वारी सुरू ठेवली. गोविंदपंत यांना ते वृद्धापकाळी वारीला गेले असताना सोलापूर येथील सिद्धरामेश्वराच्या मंदिरात पांडुरंगाने साक्षात दर्शन दिले. आजही सोलापूर येथे सिद्धरामेश्वराच्या मंदिरालगत गोविंदपंतांचे मंदिर आहे. गोविंदपंतांच्या नंतर विठ्ठलपंतांनी ही वारी पुढे सुरू ठेवली. संत ज्ञानेश्वर व त्यांच्या भावंडांनी सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून तळागाळातील समाजाला एकत्र करून याच वारीचे दिंडीत रूपांतर केले. त्यामुळे पांडुरंगाची खरी वारी आपेगावहूनच सुरू झाली असे मानले जाते. कालांतराने आनेक वर्षे आपेगावातुन वारकरी पाई वारी करु लागले तदनंतर १९६५ ला गुरुअज्ञा पाळत कै.विष्णु महाराज कोल्हापूर हे आपेगावी आले. १९६७ पासून त्याकाळी गावकरी डोक्यावर माऊलींच्या पादुका घेत दर कोस दर मुक्काम करत पाई वारी करत कालांतराने या पाई वारीचे दिंडीत रुपांतर झाले,पंचक्रोशीतील विठ्ठल भक्त ज्ञानबाच्या भक्ती रसात पंढरीला जायचे.हिच परंपरा सुरु ठेवत संत ज्ञानेश्वर महाराज जन्मभुमीतून भक्त त्रिंबकपंतानी सुरु केलेली आपेगावहून पंढरपूर पाई वारीला जवळपास 847 वर्षाची परंपरा मानली जाते,हिच परंपरा जोपासत संत ज्ञानेश्वर जन्मभुमीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर विष्णु महाराज कोल्हापूर हे या वारीत आता गुरूच्या अज्ञा पालन करत परंपरेने माता पित्याचा पालखी रथ सोहळा पंढरपूरला मोठ्या संख्येने घेवुन जातात. यंदा आपेगाव हुन माऊलींच्या माता पिता पालखीसह माऊलींच्या पादुकांचे २८ जुन शुक्रवारी सायंकाळी माऊलींच्या जन्म ठिकाणाहुन ज्ञानोबा माऊलींच्या जयघोषात पंढरपूर साठी प्रस्थान ठेवणार आसुन 29 जुन सकाळी पंढरपूरकडे रवाना होणार असुन बिड,अहमदनगर,उस्मानाबाद,सोलापूर जिल्ह्यातील 18 मुक्काम करत 16 जुलै रोजी पंढरपूर पोहचणार आहे.आशी माहिती दिंडी प्रमुख ह.भ.प. भानुदास ज्ञानेश्वर कोल्हापूरकर यांनी दिली.



## बुलढाणा पोलीस शिपाई भरती प्रक्रिया बुधवारपासून सुरू

आधुनिक केसरी न्यूज

**ज़ैनुल आबेद्दीन**

**बुलढाणा :** पोलीस शिपाई पदाकरीता शारिरीक मोजमाप चाचणी/मैदानी चाचणी ही १९ जून ते ५ जुलै या कालावधीत होणार असून पोलीस शिपाई (बॅण्डस्मन) पदाकरीता शारिरीक मोजमाप चाचणी/मैदानी चाचणी ही २ ते ३ जुलै या कालावधीत होणार आहे. शारीरिक मोजमाप व मैदानी चाचणीकरिता सुरुवातीचे २ दिवसांमध्ये ५०० व उर्वरित दिवसांनध्ये ८०० प्रमाणे उमेदवार दररोज उपस्थित राहणार असुन उमेदवारांनी मुळ आवेदन अर्ज, मुळ प्रवेश पत्र, आवेदन अर्ज भरतानांचे ३ पासपोर्ट फोटो, स्वतःची ओळख पटविण्यासाठी (अ) मुळ आधार कार्ड (ब) ङमतदान ओळखपत्र (क) वाहन परवाना / पॅनकार्ड या कागदपत्रासह पोलीस मुख्यालयाचे मैदानावर हजर रहावे. तसेच उमेदवारांनी देखील त्यांचे शैक्षणिक इ. कागदपत्रे सुस्थितीत आक्षेप व इतर अडीअडचणीचे अनुषंगाने भरती सक्षम प्राधिकारी/अपीलीय अधिकारी यांचेकडुन वेळीच निरसन करण्यात येईल. तसेच दैनिक मैदानी चाचणीचे निकालपत्र माहिती नमुद केली आहे त्याच आधारे दररोज मुख्यालयाचे सुचना फलकावर व जिल्हा पोलीस दलाचे संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. जाहिरातीत नमुद केल्याप्रमाणे उमेदवारांचे प्राथमिक कागदपत्राची तपासणी करणार येणार असून अंतिम निवड झालेल्या उमेदवारांची मुळ कागदपत्र फेर तपासणी करण्यात येणार आहे. सदर फेर तपासणीमध्ये शैक्षणिक कागदपत्रे, इतर प्रमाणपत्र खोटी, मुदतबाह्य अथवा चुकीची आढळुन आल्यास उमेदवाराला भरतीच्या कोणत्याही टप्यावर बाद करण्यात येईल, याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी. सदर पोलीस शिपाई पद भरतीचे सदर भरती प्रक्रिया ही तटस्थपणे, निःपक्षपातीपणे व पारदर्शक होणे करीता मैदानावर व मैदानाच्या परीसरामध्ये ठिकठिकाणी सीसीटिव्ही कॅमेरे बसविण्यात आले असुन पद भरतीच्या प्रत्येक टप्यावर उमेदवारांची व्हीडीओ शुटींग / सीसीटिव्हीचे चित्रीकरण होणार आहे. उमेदवारांनी कोणतेही उपकरण सोबत ठेवु नये व कोणताही गैरप्रकार (डमी उमेदवार उभा करणे इत्यादी) होणार नाही याची दक्षता घ्यावी. सदर बाब भरती प्रक्रिये दरम्यान निदर्शनास आल्यास संबंधीत उमेदवाराला भरती प्रक्रियेमधुन बाद करुन त्याचे विरुध्द योग्य ती कार्यवाही करण्यात येईल याबाबत कालावधीत जिल्हा पोलीस दलातील गोपनिय यंत्रणा कार्यान्वीत राहणार असून उमेदवारांनी कोणचाही प्रलोभन / आमिषास बळी पडू नये व कोणताही गैरप्रकार होत असल्याचे निर्दशनास आल्यास त्याबाबतची माहिती प्रत्यक्ष अवगत करुन द्यावी, असे आवाहन पोलीस प्रशासनाचे वतीने करण्यात येत आहे.

## रा. काँ. प्रदेशाध्यक्ष खा. सुनील तटकरे यांचा नगरपासून राज्यव्यापी दौरा

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** 'एकच लक्ष्य विधानसभा क्षेत्र' हे ब्रीदवाक्य घेत राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यांचा राज्यव्यापी दौरा उद्यापासून अहमदनगर जिल्हयातून सुरू होत आहे. लोकसभा निवडणुकीची धामधूम संपताच प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे यांनी पक्षाच्या कार्यकारिणीची आणि आमदारांची बैठक



घेत पुन्हा एकदा राष्ट्रवादी काँग्रेसला राज्यात भरघोस यश मिळवून देण्यासाठी राज्यव्यापी दौऱ्याची घोषणा केली होती. लोकसभेला कमी खासदार आले असले तरी विधानसभेला अजितदादांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादीची ताकद वाढवण्यासाठी प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे यांनी कंबर कसली आहे. या राज्यव्यापी दौऱ्यातून पक्षाची दिशा आणि भूमिका प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे स्पष्ट करणार आहेत.

दोन दिवसीय दौऱ्यादरम्यान अहमदनगर शहर, अहमदनगर दक्षिण ग्रामीण, कोपरगाव, अकोले, श्रीरामपूर नेवासा या विधानसभा मतदारसंघाचा आढावा प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे घेणार आहेत.




# भारताचा नकार

आधुनिक केसरी

गेल्या तीन वर्षांपासून रशिया-युक्रेन युद्धामुळे जागतिक स्तरावर अनेक घडामोडी घडताना दिसत आहेत. रशियानं युक्रेनवर केलेल्या हल्ल्यानंतर आंतरराष्ट्रीय पातळीवर वेगवेगळ्या देशांचे एकमेकांशी असणारे संबंध, आंतरराष्ट्रीय व्यासपीठावरील महत्त्व अशा अनेक गोष्टी या युद्धात कोण कुणाच्या बाजूने आहे यावरून बदलताना दिसल्या आहेत. या पार्श्वभूमीवर युक्रेन युद्धाला पूर्णविराम लागावा आणि शांतता प्रक्रिया सुरू व्हावी, या उद्देशाने स्वित्झर्लंडमध्ये जगभरातील प्रमुख देशांची परिषद आयोजित करण्यात आली होती. या परिषदेत सकारात्मक चर्चाही झाली. मात्र, ८० देशांनी सहमती दर्शवलेल्या या आराखड्यावर भारताने मात्र सही करण्यास नकार दिला आहे. ८० देशांनी स्वाक्षरी केलेल्या या आराखड्यातील सर्वात महत्त्वाचा मुद्दा युक्रेनच्या सार्वभौमत्वाचा ठरला. युक्रेनचं सार्वभौमत्व आणि त्यांच्या भूभागावरील त्यांचा हक्क या बाबी या शांतता आराखड्याच्या मूलभूत घटकांमध्ये समाविष्ट करण्यात आल्या आहेत. या परिषदेची सांगता झाल्यानंतर भारताच्या परराष्ट्र विभागातील सचिव पवन कुमार यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी "भारतानं या परिषदेमध्ये एका अत्यंत क्लिष्ट आणि तणावपूर्ण विषयावर तोडगा काढण्यासाठी सहभाग घेतला होता. पण शाश्वत शांतता फक्त चर्चा आणि डिप्लोमसीच्या माध्यमातूनच मिळवता येऊ शकते. त्यामुळे अशा चर्चांमध्ये सर्व संबंधित घटकांकडून प्रामाणिक आणि वास्तवाला धरून असा दृष्टीकोन ठेवून चर्चा व्हायला हवी. त्यामुळे दोन्ही बाजूंना मान्य असेल, असाच पर्याय शाश्वत शांतीसाठी उपयोगी ठरू शकेल", अशी भूमिका भारताकडून पवन कुमार यांनी मांडली आहे. रशियानं या परिषदेत सहभाग घेण्यास नकार दिल्याच्या पार्श्वभूमीवर भारतानं ही भूमिका घेतली आहे. रशिया आणि युक्रेन यांच्यातील युद्धाबाबत ही परिषद आयोजित करण्यात आलेली असताना त्यातील एक राष्ट्रच अनुपस्थित असल्यामुळे या परिषदेतून निघालेला तोडगा टिकू शकणार नाही, अशी भूमिका भारतानं या परिषदेत मांडली आहे. त्यामुळे आता दोन्ही बाजूंना मान्य असणारा तोडगा निघण्यासाठी पुन्हा एकदा रशिया आणि युक्रेन युद्धाव्यतिरिक्त चर्चेच्या फेरीसाठी एकमेकांसमोर येणं आवश्यक आहे. भारताव्यतिरिक्त या परिषदेत सहभागी झालेले सौदी अरेबिया, दक्षिण आफ्रिका, थायलंड, इंडोनेशिया, मेक्सिको आणि संयुक्त अरब अमिराती या देशांनीही शांतता आराखड्यावर स्वाक्षरी करण्यास नकार दिला. त्याव्यतिरिक्त निरीक्षक म्हणून परिषदेत सहभागी झालेल्या ब्राझीलनंही हीच भूमिका घेतली आहे. या पार्श्वभूमीवर एकूण ९० सहभागी देशांपैकी ८० देश आणि ४ आंतरराष्ट्रीय संस्थांनी आराखड्यावर सहमतीदर्शक स्वाक्षऱ्या केल्या असून ६ देशांनी नकार दिला आहे.

# शाळेने घडविले, कर्माने बिघडवले



प्रा.बरसमवाड विठ्ठल
गोकुळवाडी. ता. मुखेड

आधुनिक केसरी

**शाळा हे संस्काराचे विद्यापीठ असते. शाळेतूनच माणूस शिकून मोठा अधिकारी व सूज्ञ नागरिक होतो. आजतागायत कोणीही शाळा न शिकलेला व्यक्ती मोठा होऊ शकला नाही. अनेक समाजसुधारक, क्रांतिकारक, मंत्री, विचारवंत, तत्त्वज्ञ, साहित्यिक, शास्त्रज्ञ हे सगळे शाळेतूनच पुढे गेले. शाळा ही आपणाला सांघिक भावना शिकवते. खिलाडू वृत्ती निर्माण करते. भेदभाव, अस्पृश्यता नाहीसा करते. आपण सगळे एक आहोत याची जाणीव करून देते. खेळाच्या तासाला सर्वजण आपण एकत्रित येऊन खेळ खेळतो. त्यातून राष्ट्रीय एकात्मता निर्माण होते. खेळातून शरीरयष्टी बलदंड होते.**

शाळेमुळे आपल्यामध्ये नीतिमत्ता, वक्तशीरपणा,नीटनेटकेपणा, वैज्ञानिक दृष्टिकोन, स्त्री पुरुष समानता या गाभाभूत घटकांचा आपल्या मनावर परिणाम होतो.म्हणून समाजाने शाळेला स्वीकारलेले आहे. शाळा सर्वांनाच ज्ञान देते. शाळेमुळे माणूस साक्षर होतो. शाळेमधूनच,समता, स्वातंत्र्य, न्याय, बंधुता या गोष्टी शिकविल्या जातात.शाळेमध्ये अनेक सामूहिक गीते, देशभक्ती पर गीते पाठांतर करून घेतले जातात. तसेच अनेक प्रकारच्या प्रार्थना म्हटल्या जातात.शेतकरी, मजूर, कष्टकरी, श्रमिक, व्यापारी या सर्वांचीच माहिती शाळेच्या पाठ्य पुस्तकातून आपणास शिकवली जाते. म्हणून शाळा ही एक संस्काराची सरिता आहे. आपण सगळे एकत्रित शाळेमध्ये येऊन योगासने करतो. शाळेमधूनच वेगवेगळे विशेष दिन साजरे करून विद्यार्थ्याला सक्षम नागरिक बनवितात. राखी पौर्णिमा, मकर संक्रांत या सणातून आपलेपणा वाढतो. शाळेमधूनच निवडणुकीचे सुद्धा प्रशिक्षण वर्गात दिले जाते, शाळेत एक वर्षाचे मंत्रिमंडळ तयार केले जाते. अशीही शाळा प्रत्येकाला हवीहवीशी वाटते. आज शाळेमुळेच आपण सगळे बौद्धिकदृष्ट्या प्रगल्भ होत आहोत. शाळा ही सर्वांना शिस्त शिकविते. रांगेत उभे रहा. रांगेनुसार चला,खरे बोला, वडीलधाऱ्या व्यक्तीचा आदर करा.प्राणीमात्रावर दया करा हे आपल्याला शाळा सांगते. कितीतरी गोष्टी शाळेतून शिकवल्या जातात. शाळेमध्ये असणारे गुरुजी, शिक्षक विद्यार्थ्यांना सर्वांगीण विकासाचे, प्रगतीचे धडे देतात, मातृभाषेतून शिकवून भाषेचा विकास करतात.
त्यामुळे आपली मायबोली आपण सहज शिकून जातो. शाळेमध्ये इतर भाषा सुद्धा शिकवून जगातल्या इतर भाषेचे ज्ञान विद्यार्थ्यांना करून दिले जाते. म्हणून शाळा हे ज्ञान देणारे विद्यापीठ आहे. आई- वडील मुलांना शाळेत आणून बसवतात,मुलं सुरुवातीला रडतात, शाळेतून निघून घरी जातात, परत त्यांना शाळेत आणून बसवले जाते ही सर्व जडणघडण विद्यार्थ्यांची लहानपणी शाळेतच होते. राग, लोभ, चांगले, वाईट, स्वातंत्र्य पारतंत्र्य अभिमान, स्वाभिमान हे सर्व शाळेतूनच शिकविले जातात. म्हणून शाळेने आम्हाला सर्व काही दिले. ज्यांना वेळेचे आणि पुस्तकाचे महत्त्व कळले, तेच जीवनात यशस्वी झाले. शाळेमध्ये पुस्तकातून माणसाला जीवनाचे योग्य ज्ञानाचे धडे वाचायला शिकवतात. तेव्हा विद्यार्थी आव्हानात्मक प्रसंग सुद्धा सहजासहजी सोडवतात हे सर्व आपणाला शाळा शिकवते. शाळेमध्ये वेगवेगळ्या प्रकारचे कार्यक्रम घेतले जातात. त्यातून विद्यार्थ्यांचा बौद्धिक विकास होतो,म्हणून शाळा ही सर्व समाजाला घडवते असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. आजच्या परिस्थितीत मुले भरकटलेली दिसून येत आहेत. मुले शाळेतून, कॉलेजमध्ये जातात, तिथे गेल्यानंतर अनेक नवीन मित्र-मैत्रिणी भेटतात आणि पुढे मग त्यांचा समाजाशी व इतर घटकाशी संपर्क येतो आणि हळूहळू काही मुले वाममार्गाकडे जातात. ही मुले पुढे गुन्हेगारीच्या क्षेत्रात जाऊन छोटे- मोठे गुन्हे करायला शिकतात हे सर्व त्यांनी केलेल्या कर्माची फळे असतात. कर्म नीट करत चला, तुम्हाला चांगले फळ मिळतील जर तुम्ही वाईटाच्या संगती मध्ये गेलात तर तुमचे वाईटच होईल म्हणून सुसंगती सदा घडो असे विचारवंत म्हणतात. काही श्रीमंतांची मुले सुद्धा वाईट संगतीमुळे वाममार्गाला लागून आयुष्याचे वाटोळे करून घेतात. झरा जसा एखाद्या पर्वतातून उगम पावतो तिथे तो अतिशय स्वच्छ असतो, परंतु पुढे पुढे जाऊन तो वेगवेगळ्या नद्यांना मिळतो, त्यामुळे त्याच्यामध्ये केर-कचरा, खत, मूत्रविसर्जन प्लॅस्टिकच्या पिशव्या, कारखान्याचे दुर्गंधी युक्त पाणी, गाई गुरे धुणे हे त्यामुळे ते पाणी दूषित बनते




तसेच विद्यार्थी ही पुढील जीवनात चुकीच्या व्यक्तीच्या मागे लागून दुष्कृत्य करतात. अन्याय अत्याचाराच्या सावलीला बसतात. आई-वडिलांचे ऐकत नाहीत, मित्र-मैत्रिणी जे बोलतात तेच खरं आहे असे त्यांना वाटते, वय वाढत जाते, केस वाढवून देवानंद होतात. विवेकानंद होण्याचे विसरून जातात. कितीतरी तरुण मुलं-मुली आज व्यसनाधीन झालेली आहेत. अफू, गांजा, चरस, ड्रग्ज तंबाखू, गुटखा, सिगारेट, दारू यापासून ते सुटू शकले नाहीत. तरुण मुले-मुली आज आपल्या कर्माची फळ भोगत आहेत. आई-वडिलांच्या समोर काही मुला-मुलींचा मृत्यू होत आहे, ही अतिशय खेदजनक बाब आहे. तंबाखू चघळून कर्करोगाला निमंत्रण देतात. अल्कोहोल मिश्रित अनेक पेय पिऊन शरीराचे चाळणी करून घेतात. त्यातून वेगवेगळे दम्याचे आजार उद्भवतात आणि अकाली त्यांच्या कर्माची फळ ते भोगतात,म्हणून मला म्हणावं वाटते की? शाळेने विद्यार्थ्यांना भरपूर घडविले परंतु ते त्यांच्या स्वतःच्या कर्माने बिघडून गेले. जशी तुमची संगत तशी तुमचे कर्म असं म्हटलं जाते.चंदन तुमच्या हाताला लागले की हात सुगंधित होतात. कोळशाला हात लावल्यास हात आपोआप काळे होतात, म्हणून चांगल्याच व्यक्तीची संगत धरा, चांगलेच मित्र तयार करा. तुमच्या जीवनात कष्टाला फार महत्त्व आहे. त्यासाठी कष्ट करा. तरच हे जीवन सुंदर आहे,असे म्हणता येईल.आज आपण सर्वत्र पाहत आहोत.तरुण झिंगत आहेत ,तरुणांना उद्याचे भविष्य नाही. व्यसन करून थुंकून थुंकून तोंडातली लाळ संपून जात आहे,वीस-वीस दिवस न धुतलेली जीन्स घालून वर केसाचा कोंबडा करून अनेक तरुण आज चुकीच्या दिशेने पावले टाकत आहेत. काही जण रात्र झाली की घराबाहेर पडतात. रेल्वे टेशन, बस स्टेशन गर्दीच्या ठिकाणी आज अनेक तरुण चुकीच्या मार्गाने जाऊन वाईट कृत्ये करून तुरुंगात जाऊन बसत आहेत,म्हणून तरुणांना मला हे सांगायचं आहे की ? तुम्ही तुमच्या अंगी जिद्द बाळगा, त्यावेळेस तुम्हाला कर्माची चांगली फळे मिळतील. तुम्ही कडुनिंबाचे झाड लावून आंब्याची अपेक्षा करू नका.आज व्यापारामुळे आपला देश जगाशी जोडला गेला आहे खाजगीकरण,उदारीकरण, जागतिकीकरण यामुळे आपण दळणवळणाशी एकत्रित जोडले गेलो आहोत.सध्याची तरुणाई व्यायामा पासून दूर आहे.गड ,पर्वत, किल्ले चढून त्यांना माहित नाही. घरातल्या घरात बसून सुडौल होत आहेत. चपळाई फार कमी झालेली आहे. धावणे, पळणे, खो-खो खेळणे, कबड्डी, कुस्ती, लगोरी, विटीदांडू, या खेळापासून तरुण फार दूर आहेत. त्यामुळे ते वेगवेगळ्या रोगांनी आजारानी त्यांना पछाडलेले आहे. हे सर्व आपल्या कर्माने आपणाला बिघडून टाकले आहे.तुम्ही चांगले कर्म करा. चांगली फळे तुम्हाला मिळतील. म्हणूनच शाळेनी घडविले आणि खरोखरच कर्माने अनेक जणांना बिघडविले आहे.यात तीळमात्र शंका नाही हे वास्तविक कटू सत्य आहे. जे काल सत्य होतं,ते आज सत्य आहे आणि उद्याही सत्य राहणारच आहे. म्हणून शाळा सुरू झाल्या आहेत. चांगले शिका, संघटित व्हा, एकात्मता पाळा. भेदभावापासून दूर राहा. कोणाच्या दबावाखाली दडपणाखाली वागू नका. पर स्त्रीला मातेसमान माना शाळेतले संस्कार आपणास जीवनभर स्मरणामध्ये राहतात.आपले कर्म आपले जीवन घडवितात. कर्मा नुसार ज्याच्या त्याच्या फळे मिळतात.कर्म जर वाईट आहे असे म्हणून आपण वाईट वागलो तर त्याची फळे ही वाईट मिळतात, म्हणून नीतीने चला,जमेल तेव्हा गरीबाची सेवा करा,त्यातून भरपूर आनंद मिळेल,आपल्या अंगणात वृक्ष लावले की दुसऱ्यांच्या अंगणात सावली पडते, फुले पडतात, निसर्ग जसा सर्वांना घेऊन चालतो, तसेच आपणही सर्वांना घेऊन चालावे. शेवटी जे खळांची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मी रती वाढो भुता परस्परे पडो । मैत्र जीवाचे ।। जे वाईट आहेत.त्यांना शिक्षा मिळेल,जे चांगले आहेत त्यांना सुमधुर फळे मिळतील. म्हणून शाळा संस्कार देते,आपण कर्मानुसार चांगले वाईट वागून त्यानुसार फळे घेत असतो. या लेखांमध्ये एवढेच सांगणे आहे की कर्म चांगले करा, फळे आपोआप चांगले मिळतील.

# जीवनात गती नाही तर दिशा निर्णायक ठरते



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**जीवन हितार्थ गती नाही तर दिशा निर्णायक ठरते दिशा चुकली तर प्रचंड अति प्रचंड गती देखिल निरूपयोगी ठरते म्हणून जीवनात योग्य दिशेने योग्य गती ठेवता आली पाहिजे.जीवन म्हटलं की अनेक विषय अनेक बाबी असतात आणि प्रत्येक विषयाच्या अनुषंगाने अथवा आयुष्यातील प्रत्येक लढाई जिंकण्यासाठी गती पेक्षा दिशा हिच महत्वपूर्ण दिशादर्शक ठरते.जिंकण हि प्रत्येकाची मनोमन इच्छा असते.अपयश कोणालाही नको असतं.यश हे प्रत्येकाला हवं आहे. आपण हवं असणारं यश अर्जित करण्यासाठी दिशा योग्य असली पाहिजे.आपण ज्या क्षेत्रात यशस्वी होऊ इच्छित आहेत त्या क्षेत्रात प्रयत्न करत असताना आपल्या सह आपले सहकारी अथवा त्या क्षेत्रातील इतर मान्यवर या सगळ्यांची जिंकण्याची भावना हि जवळपास समान असतेच.**

मात्र त्या साठी प्रत्येकाचा मार्ग आणि मंत्र हा वेगवेगळा असतो आणि त्या नुसारच यश अपयश ठरत असत.पण खात्रीशीरपणे यशस्वी होण्यासाठी गती पेक्षा दिशा हि महत्वपूर्ण निर्णयक ठरते. जीवनात आपण आपल्या इच्छित क्षेत्रात जेव्हा यश संपादन करण्यासाठी प्रयत्न करतो तेव्हा आपण निश्चित केलेली दिशा हिच निर्णायक ठरते.दिशा योग्य निवडली तर यश नक्कीच मिळेल आणि दिशा चुकली तर दुर्दशा हि निश्चित आहे. आपल्याकडं बळ,शक्ति,सामर्थ्य किती आहे या पेक्षाही आपली दिशा चुकणार नाही हि काळजी घेणं खूप गरजेचं आहे. जीवनाची दुर्दशा हि सहजासहजी होत नाही.योग्य वेळी आपली दिशा चुकली तर मग मात्र दुर्दशा हि निश्चित असते.मानवी जीवनात वेळेला खूप महत्त्व आहे योग्य वेळी योग्य दिशा निश्चित करता आलीच पाहिजे.योग्य वेळी दिशा चुकली तर जीवनाची दुर्दशा होणं निश्चित आहे.वेग किती सुसाट आहे अथवा मंद आहे याला फार महत्त्व नसुन दिशा सुयोग्य आहे कि नाही याला खुप महत्व आहे.जगातील सगळ्यात शक्तिशाली वेगवान बाब सुद्धा अयोग्य दिशेने गतिमान झाली तर सुयोग्य ठिकाणी पोहचण्याची सुताराम शक्यता नसते.जीवनाच्या संघर्षमय प्रवासात आपल्या सोबत आपल्या बाजूने कोण आहे किंवा नाही हे महत्वाचं नाही त्याच बरोबर आपल्या कडे सर्व सेवा सुविधा आहेत किंवा नाहीत यालाही शुन्य महत्व आहे.कारण दिशा योग्य असेल तर सोबत कोणीही नसलं तरी सुद्धा आपण एकटे देखिल पुरेसे आहेत दिशा योग्य असली तर आपण एकटे सुद्धा मनोवांछीत धेय्य ठिकाण हे गाठणारच या मध्ये अजिबात शंका नाही आपल्याला प्रचंड मोठं पाठबळ बलाढ्य शक्ति आपल्या सोबत असली किंवा आपल्या मागे सृष्टी वरील सगळ्यात प्रबळ शक्ती ने पाठबळ जरी उभे केले आणि नेमकं आपली दिशा हि मात्र अयोग्य असेल तर काहीच उपयोग होत नाही हे वास्तव आहे.म्हणून जीवनात योग्य ठिकाणी पोहोचायचं असेल किंवा प्रत्येक बाबी मध्ये यशस्वी होयच असेल तर आपली दिशा हि सुयोग्य असण खुप महत्वपूर्ण आहे.मुख्यत्वे आपली अडचण हिच आहे आपण दिशा पाहण्या ऐवजी संसाधन पाहतो पाठबळ पाहतो. आपल्याकडं काय उपलब्ध आहे.तसेच आपल्या सोबत कोण कोण आहे कोण नाही हे पाहते.व आणखी आपल्या पाठीशी किती पाठबळ उभा करता येईल यावरच आपण जास्त खल करत असतो मुख्यत्वे आवश्यकता हि आहे कि दिशा सुयोग्य आहे कि नाही हे निश्चित करण्याची असते.अगणित पाठबळ असणाराही अयोग्य दिशेने निघाला तर सुयोग्य ठिकाणी पोहचु शकत नाही.म्हणून आपल्या पाठीशी काय आहे काय नाही याला फार महत्त्व नाहीच.आपल्या जवळ जे आहे त्या सामर्थ्यवर सार्थ विश्वासावर व आपल्याकडील उपलब्ध संसाधन च्या आधारावर जर आपण प्रवासाला सुरुवात केली तर अशा वेळी मात्र आपल्याला कोणतंही संकट वादळ आपल्या इच्छीत ठिकाणी पोहचण्या पासुन रोखु शकत नाही.आणि यदकादाचित जर आपण अपयशी झाले तर मग मात्र आपल्या सोबत असणारी शक्ति,ताकद संसाधन ,पाठबळ मग ते वेगवेगळ्या प्रकारचे असले तरी आपण कमी पडलो.तर मग आपण नेमकं कुठे कमी पडलो तर याच उत्तर हेच आहे कि आपली दिशा हि अयोग्य होती.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - बाजीराव श्रीराम खांदवे, अहमदनगर कार्यालय - तिसरा मजला, खरेदी विक्री संघाची जुनी इमारत, मार्केट यार्ड, स्टेशन रोड, अहमदनगर ४१४००१, फोन ९८२२१०७६५०. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * Executive Editor - Bajirao Shriram Khandave. Ahmednagar office - third floor, kharedi - vikri sangh old building, Market yard Station Road, Ahmednagar 414001. Phone 9822107650.(* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# वडोदफाटा ते धनसेवाडी रोडचे निकृष्ट डांबरीकरण उखडले

## चार महिन्यांपूर्वीच्या डांबरीकरणाचे वाजले बारा : चौकशी करून कारवाईची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**सुधाकर जेठे**

**फुलंब्री :** तालुक्यातील छत्रपती संभाजी नगर - जळगाव राष्ट्रीय महामार्गावर जोडलेला वडोद फाटा ते धनसे वाडी या रोडचे प्रधानमंत्री सडक योजने अंतर्गत मजबुतीकरण व डांबरीकरण चार महिन्यापूर्वी काम करण्यात आले असून सदर काम निकृष्ट असल्याने पहिल्याच पावसात सदर डांबरीकरण अनेक ठिकाणी खचले आहे. या कामाची चौकशी व दुरस्तीची मागणी केली जात आहे.





फुलंब्री तालुक्यातील वडोद बाजार येथील राष्ट्रीय महामार्गावरील वडोद फाटा कमान ते धनसेवाडी या ३ कि मी जवळपास शिवावरील रोडचे काम प्रधानमंत्री सडक योजनेतून चार महिन्या पूर्वी करण्यात आले आहे. सदर रोडवर खडी व सोलींग न टाकता थातुर मातुर काम करत डांबरीकरण करण्यात आले . काम सुरु असतांना अनेकांनी या कामा बाबत अभियंता व गुत्तेदार यांच्याकडे तक्रारी केल्या होत्या. परंतु सदर तक्रारी कडे डोळे झाक करून अभियंता व गुत्तेदार यांच्या हित संबंधामुळे सदर काम निकृष्ट करण्यात आले. ज्यामुळे पहिल्याच पावसात बोगस कामाचे पितळ उघडे पडले आहे. या रोडवरील डांबरीकरण पुर्णतः बसले असून डांबर उखडले आहे. माती अनेक ठिकाणी उघड झाली आहे. सदर कामाची वरिष्ठाकडून तात्काळ पहाणी करून सदर काम पुन्हा पूर्ण दुरस्त करून गुत्तेदाराला काळा यादीत टाकण्याची मागणी वडोद बाजार ग्रामस्थांतर्फे करण्यात येत असून सदर तक्रारीची वरिष्टांनी तत्काळ दखल न घेतल्यास उपोषण व आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

सदर वडोद फाटा ते धनसे वाडी या रोडचे डांबरीकरण हे कंपन मशीनने दबाई न करता व खडी सोलींगचा योग्य वापर न करता हे मजबुती करण व डांबरीकरण निकृष्ट दर्जाचे झाले आहे . त्यामुळे हा पूर्ण रोड खचला व डांबर निघून मोठमोठे खड्डे पडले आहेत . सदर कामाची वरिष्ठाकडून चौकशी होऊन तात्काळ दुरस्ती करण्यात यावी . अन्यथा आंदोलन छेडले जाईल .
**श्री गोपाल राधाकिसन वाघ, उपसरपंच – वडोदबाजार**

वडोद फाटा ते धनसेवाडी रोडचे काम निकृष्ट दर्जाचे झालेले आहे . सदर गुत्तेदार व अभियंता यांना वारंवार कल्पना देण्यात आली . परंतु त्यांच्यातील अर्थपूर्ण संबंधांमुळे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याने डांबर पूर्ण खचले आहे . तात्काळ दुरस्ती करून गुत्तेदाराला काळ्या यादीत टाकावे . अन्यथा आंदोलन करण्यात येईल .
**श्री शिवराम जगन्नाथ म्हस्के , माजी जि प सदस्य वडोद बाजार**

**उलट्या बोंबा असलेला सुचना फलक** मुख्यमंत्री ग्राम सडक योजना सुचना : सदर रस्ता अवजड म्हणजे ८ .०० टन प्रती एक्सल पेक्षा अधिक वजनाच्या वाहना करिता प्रतिबंधीत आहे . हा रस्ता आपण सर्व गावकऱ्यांचीच संपत्ती आहे . तरी रस्त्यावर होणाऱ्या अवजड वाहतुक तसेच सदरील रस्त्यावर पाईपलाईन साठी खोदकाम करण्यात येऊ नये आणि अतिक्रमण होण्यापासुन वाचवा . **ग्राम पंचायत धनसेवाडी, कार्यकारी अभियंता प्रधानमंत्री ग्राम सडक योजना, छत्रपती संभाजीनगर**



# गुणवंत विद्यार्थी सत्कार, शाळा प्रवेशोत्सव

आधुनिक केसरी न्यूज

**संगमनेर :** श्री भारतीबाबा विद्यालयाची उज्ज्वल निकालाची परंपरा कायम ठेवत यावर्षी एस.एस.सी मार्च 2024 चा विद्यालयाचा निकाल शेकडा 90.90 टक्के लागला. शाळेच्या पहिल्या दिवशी एस.एस.सी. मार्च 2024 च्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. विद्यालयातील प्रथम क्रमांक प्राप्त विद्यार्थिनी कुमारी संस्कृती वचन कोकणे हिला 89.90% गुण मिळाले. तसेच शाळेच्या पहिल्या दिवशी शाळेत प्रवेश घेतलेल्या इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांचे गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले. इयत्ता पाचवी ते आठवीच्या विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तकांचे वितरण करण्यात आले. यावेळी चिकणी गावच्या सरपंच कुमारी गायत्रीताई माळी, उपसरपंच सी. के. मुटकुळे शालेय समितीचे निमंत्रित सदस्य विलासराव वर्पे, भारतराव वर्पे, आनंदराव वर्पे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रविंद्र वर्पे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापकसुंबे आर. एन. सर हे होते. त्यांनी अध्यक्षीय भाषणातून गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव केला व पुढील वर्षी बोर्ड परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना अभ्यासाच्या बाबत नियोजन करणे महत्त्वाचे असते हे सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक बिडकर सर यांनी केले. कार्यक्रमाचे आभार श्रीमती शिंदे मॅडम यांनी मांडले व सूत्रसंचालन पवार सर यांनी केले. यावेळी विद्यालयातील सर्व सेवक वृंद व ग्रामस्थ उपस्थित होते.

# भूमिपुत्रचा सरकारविरोधात 20 पासून एल्गार

आधुनिक केसरी न्यूज

**शंकर सदार**

**रिसोड :** वाशीम जिल्ह्यातील अनेक तालुक्यात उन्हाळयात



एप्रिल मधील 8,9,10 तारखेला गरपीट, अतिउरुष्टीने उन्हाळी उभ्या पिकांचे प्रचंड नुसकान झाले होते. शतकर्यांचा हाता तोंडासी आलेला घास नैसर्गिक आपत्तीमुळे हेरावून नेला. या मधे कांदा बी, उन्हाळी मुंग, उडीद, भाजीपाला, फळ पिके, शेतकऱ्यांचा शेतातील सॉलर पॅनलही उखडून गेले. प्रशासनाने सर्व प्रकारचा नुसकानीचे सर्व्हे केले परंतु राज्य शासनाने मदतीच्या बाबतीत अद्याप कुठलाही निर्णय घेतला नाही. राज्य सरकारने एप्रिल मधे झालेल्या नुसकानीची मदत तात्काळ घोषित करून शेतकऱ्याचा खात्यात जमा करण्यासाठी भूमिपुत्र शेतकरी संघटनेकडून मुख्यमंत्री मा. एकनाथजी शिंदे, महसूल मंत्री, कृषी मंत्री तथा मदत व पुनर्वसन विभागाला पत्र दिल्याचे भूमिपुत्रचे संस्थापक अध्यक्ष विष्णुपंत भुतेकर यांनी सांगितले.

लोकसभा निवडणूककिची आचार संहिता लागण्या आधी राज्य सरकारने सोयाबीनउत्पादक शेतकऱ्यांसाठी भावांतर योजने अंतर्गत पाचहजार कोटीची तरतूद केली होती. सरकारने त्या मदतीचे वाटप तात्काळ सुरु करावे. राज्यातील शेतकऱ्यांचे पीक कर्ज पूर्ण पणे माफ करावे. पीक कर्ज वाटपस दिरंगाई करणाऱ्या आणि कर्ज वाटप धोरणा नुसार न करणाऱ्या सहकारी बँका , खाजगी बँका आणि राष्ट्रीकृत बँकावर कारवाई करण्यात यावी. या सर्व मागण्या बाबत राज्य सरकारने सकारात्मक निर्णय घ्यवा अन्यथा भूमिपुत्र कडून 20 जून पासून रस्त्यावर उतरून आंदोलन करणार असल्याचे भूमिपुत्र शेतकरी संघटने कडून कळवन्यात आले आहे.

# विजय पळसकर यांना सेवारत्न पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**ज़ैनुलआबेद्दीन**

**मेहकर :** रविवारी सहकार महर्षी कै भास्कररावजी शिंगणे बहू शिक्षण प्रसारक संस्था वडगाव माळी या संस्थेने 51 जोडप्याचा सामूहिक विवाह संपन्न झालाण् त्यानिमित्ताने समाजामध्ये उत्कृष्ठ कार्य करणाऱ्या 24 जणांना पुरस्कार वितरण केले त्यामध्ये विजय पळसकर यांच्या वाचन संस्कृती चा आढावा घेऊन संस्थेचे अध्यक्ष जगनाथ जाधव दत्ता पोफळे यांनी विजय पळसकर यांना राज्यस्तरीय सेवा रत्न पुरस्कार जाहीर केला कार्यक्रमच्या अध्यक्षस्थानी सेवा निवृत्त गटविकास अधिकारी गजानन पाटोळे बीडीओ तर प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य डॉ पंढरीनाथ शेळके हे होते. सर्वप्रथम महापुरुषांच्या फोटो ला दिपज्वलन व पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरवात झाली व त्या नंतर विजय पळसकर यांना राज्यस्तरीय सेवा रत्न पुरस्कार देण्याकरता गजानन पाटोळे डॉ. पंढरीनाथ शेळके, डॉ. निवृत्ती जाधव, गणेश तांगडे, गजानन पायघन, श्रीकृष्ण सास्ते, जगन्नाथ जाधव, सुनीता खरात, पल्लवी वैराळ, सविता गवई, यांच्या हस्ते पुरस्कार देण्यात आलाण् प्रास्ताविक संस्थेचे अध्यक्ष जगनाथ जाधव यांनी केले तर संचालन शिवप्रसाद ठुटे सर यांनी केले समाजामध्ये विजय पळसकर यांनी उत्कृष्ठ कार्य केल्याबद्दल व राज्यस्तरीय सेवा रत्न पुरस्कार मिळाल्याबद्दल अनेक विविध मान्यवरांनी विजय पळसकर यांचे अभिनंदन केले.





# ग्रामपंचायतकडून नालीसफाईला सुरुवात

आधुनिक केसरी न्यूज

**देऊळगाव मही :** देऊळगाव राजा तालुक्यातील सर्वात मोठी ग्रामपंचायत असलेल्या ग्रामपंचायत प्रशासनाने वेळीच दखल घेत रस्त्यावरील घनकचरा, काँक्रीट रस्त्यालगत असलेल्या नाल्या साफसफाई मोहीम पावसाळ्यापूर्वीच सुरू केली.यामुळे पावसाळ्यातील साथीची रोगराई पासून ग्रामस्थांचे संरक्षण होणार आहे.

पावसाळ्यात अस्वच्छता पसरल्याने साथीचे रोग पसरतात ह्या आजारांपासून नागरिकांचा बचाव करण्या च्या दृष्टीने सरपंच कमल उमेश शिंगणे व ग्रामपंचायत सदस्यांनी पर्यायी उपाय योजना म्हणून गावातील नाल्या स्वच्छता, घनकचरा व्यवस्थापनाची पूर्व पावसाळी कामांना सुरुवात करण्याचे निर्देश ग्रामपंचायत प्रशासनाला दिले. यानुसार प्रभाग क्रमांक सहा चे ग्रामपंचायत सदस्य संदीप राऊत यांनी स्वतः स्वयंस्फूर्तीने पुढाकार घेऊन प्रभागाची नाल्या सफाई कामगार कडून नाली साफसफाई चे काम हाती घेतले. त्यांच्या कार्याची प्रभागातील नागरिकांकडून कौतुक होत आहे.

# रेल्वेत नोकरीच्या आमिषाने 6 कोटींचा गंडा

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** रेल्वेत नोकरी देण्याचे आमिष दाखवत एका महिलेसह ६२ जणांना सहा कोटीहून अधिक रुपयांना फसविल्याप्रकरणी पाच परप्रांतीयांसह सात जणांविरूध्द उपनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वीरेश वाबळे (रा. जेलरोड) हे जिमखान्यात प्रशिक्षक म्हणून कार्यरत आहेत. १५ ते १८ डिसेंबर २०२१ या कालावधीत वाबळे यांचे परिचित शैलेंद्र महिरे यांनी भ्रमणध्वनीवरून संशयित रमणसिंग उर्फ विशालसिंग (रा. कोलकाता) याच्याशी वाबळे यांचे बोलणे करून दिले. रमणसिंगने महिरे यांच्या मुलाला रेल्वेत नोकरीला लावून दिले होते. रमणसिंगने वाबळे यांना त्यांच्या पत्नीस रेल्वेत नोकरीस लावून देण्याचे आमिष दाखविले. या कामासाठी रमणसिंगने बावळे यांच्याकडून आठ लाख रुपये घेतले. या कालावधीत रमणसिंग, निरज सिंग (रा. झारखंड), ऋतूराज पाटील उर्फ हेमंत पाटील (रा. सांगली), राजेंद्र सिंग (रा. कोलकाता), अंशूमन प्रसाद (रा. रांची), संदीप सिंग, जैद अली (रा. वाशी) यांनीही नोकरीचे आमिष दाखवत वाबळे यांच्याकडून पैसे उकळले.

# भावनेच्या आहारी जाऊ नका, पुढच्या प्रवासाला साथ द्या

## माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर : योग्यवेळी योग्य निर्णय घेऊ

आधुनिक केसरी न्यूज



**बीड :** सध्याच्या सुरू असलेल्या एकंदरीत राजकीय परिस्थितीचा आढावा घेवून आणि तुमच्या सर्वांच्या भावना लक्षात घेवून योग्य वेळी योग्य निर्णय घेवू असे प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले.

आशिर्वाद मंगल कार्यालयात आयोजीत करण्यात आलेल्या भव्य कार्यकर्ता मेळाव्यात ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर जेष्ठ नेते रविंद्र क्षीरसागर, सौ.प्रियाताई क्षीरसागर (महिंद्रे), ह.भ.प.नाना महाराज ढेकणमोहाकर, जगदिश काळे, माधवराव मोराळे, विलास बडगे, गंगाधर घुमरे, तानाजी कदम, दिनकर कदम, बाबुसेठ लोढा, अशोकराव होके पाटील, सहाल चाऊस, अरूण डाके, वचिष्ठ नवले, रोहित क्षीरसागर, हेमंत क्षीरसागर, शरद ढाकणे, गणपत डोईफोडे, अजिंक्य चांदणे, सुधाकर मिसाळ, मुखीद लाला, ॲड.सय्यद खाजा, नरसिंह नाईकवाडे, सनी वाघमारे, विलास विधाते, राणा चौव्हाण, दिलीप आहेर, उषाताई सरवदे, सुभाष क्षीरसागर, सुभाष बनसोडे, सखाराम मस्के, सुधाकर जाधव, अरूण बोंगाणे, सुलेमान पठाण, जमील भाई, राजेंद्र काळे, शेषेराव फावडे, धनंजय जगताप, शिवाजीराव जाधव, सचिन घोडके, भगवान गवते, अर्जून नरवडे, सिध्देश्वर आर्सुळ, विष्णु जाधव यांची उपस्थिती होती.

प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर, स्व.काकू-नाना यांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक दिनकर कदम यांनी केले तर तानाजी कदम, उषाताई सरवदे, सुधाकर मिसाळ, बाबूसेठ लोढा, अजिंक्य चांदणे, गंगाधर घुमरे आदिंनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी बोलतांना माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर म्हणाले की, यावर्षी निसर्गानेच कृपा केली आहे, वेळेवर मृगाचा पाऊस पडल्यामुळे आपला शेतकरी बांधव शेतीच्या कामाला लागला आहे. आज सर्वांचा मनापासून आशिर्वाद मिळावा यासाठीच हा मेळावा आयोजीत करण्यात आला आहे. व्यासपीठासह समोर असलेल्या हजारोंचा माझा परिवार आहे. कुटूंबाशी आणि प्रत्येकाशी संवाद साधावा म्हणूनच हा कार्यक्रम घेतला आहे. कधी नव्हे ते निसर्गानेही साथ दिली आहे. वेळेवर सर्व कामे होवू लागली आहेत. लोकशाहीत जय-पराजय असतोच पराभवाने खचून जायचे नाही आणि यशाने हुरळून जायचं नाही. हा विचार आम्ही करतो. माझा एक-एक कार्यकर्ता हजार मताचा मालक आहे. हा अनुभव आजचा नाही, पराभवाच्या आणि संकटाच्या काळात हा कार्यकर्ता सोबत राहिला आहे. अपयश आले तर खचून न जाता आपण कुठे कमी पडलो यावर फोकस करून आम्ही पुन्हा नव्या उमेदीने पुढे जात असतो. संकट काळात लोकांच्या मदतीला जाणे हा आमचा पिंड आहे. बीड जिल्ह्यात निसर्गाने अनेकवेळा पाठ फिरवली. बीड जिल्ह्यातील शेती पाण्यावर अवलंबून आहे आणि नेमका हाच प्रश्न आपण सोडवण्यासाठी प्रयत्न करत आहोत. सत्ता असतांना अनेक गावांमध्ये साठवण तलाव, बंधारे, विहीरी अशी कामे करून त्या भागात शेतकऱ्यांसाठी महत्वाचे कामे केले आहेत. मराठवाड्याचा पाणी प्रश्न सुटला पाहिजे. सोलापुर-धुळे हा मार्ग असो, न्यायालयाची बिल्डींग असो, एस.पी.ऑफीसची बिल्डींग, वीज वितरण विभागामार्फत अनेक गावात सबस्टेशन अशी विविध विकास कामे आज पूर्ण झालेली दिसतील. याचा लाभ ग्रामीण भागातील नागरीकांना झाला याचे समाधान आहे. जुमले आणि जुगाडावर आजचे राजकारण सुरू आहे. नुसता धुरळा सुरू आहे. त्यामुळे फक्त फुफाटा दिसु लागला आहे. आता निर्णायक वेळ आली आहे. सर्वांनी बरोबर राहण्याचा संकल्प करूया. आगामी काळात जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगर पालिका पुर्ण ताकदीने लढायच्या आहेत. दुरदृष्टीकोन ठेवूनच आता सर्वजण एक व्हा. आपलं ध्येय लक्षात घ्या.

भावनेच्या आहारी जावू नका. पुढच्या प्रवासात खंबीरपणे पाठीशी उभे रहा. राजकारणात आणखी कोणती खिचडी होईल हे सांगता येत नाही. त्यामुळे आपण सेवाभाव ठेवून काम करूया. प्रत्येक कार्यकर्त्याच्या पाठीशी आपण खंबीरपणे उभे राहु असा विश्वास देत माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी कार्यकर्त्यांना बळ दिले. यावेळी राजू कांबळे, शेख इकबाल यांनी असंख्य कार्यकर्त्यांसह माजी मंत्री क्षीरसागर गटात प्रवेश केला. सकाळी 11 वाजता आयोजीत करण्यात आलेल्या मेळाव्यात संपूर्ण सभागृह आणि सभागृहाच्या बाहेरचा परिसर खचा-खचा भरला होता. अत्यंत जल्लोष आणि उत्साहात आलेल्या कार्यकर्त्यांनी आपल्या नेत्याला आत्मविश्वास देवून समर्थ साथ देण्याचे अभिवचन दिले. यावेळी जिल्ह्यातील कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



# माहेश्वरी विद्या प्रसारक मंडळ व जुगलकिशोर मालू यांच्याकडून विद्यार्थ्यांना लॅपटॉप वितरण

आधुनिक केसरी न्यूज

**लातूर :** महेश नवमी निमित्त माहेश्वरी विद्या प्रसारक मंडळ व जुगलकिशोर मालू यांच्याकडून विद्यार्थ्यांना लॅपटॉप वितरण करण्यात आले. समाजातील होतकरू व गरजवंत 24 विद्यार्थ्यांना लॅपटॉपचे वितरण करण्यात आले. 12 वी नंतर ज्या विद्यार्थ्यांना लॅपटॉपची गरज आहे. अशा 24 होतकरू विद्यार्थ्यांना लॅपटॉपचे वाटप लातूर जिल्हा माहेश्वरी सभा अध्यक्ष सी ए प्रकाश कासट, लातूर अर्बन बँकेचे संस्थापक अध्यक्ष प्रदीप राठी, गांगाभिषण मालू यांच्या हस्ते शानदार सोहळ्यात दि. 16 रोजी कस्तुर कांचन सभागृह येथे संपन्न झाले.

दीपप्रज्वलनाने कार्यक्रमांची सुरूवात करण्यात आली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक माहेश्वरी विद्याप्रचारक मंडळाचे गव्हर्निंग कौन्सिल चे सदस्य श्री शैलेश मालू यांनी केले. ही सामाजिक संस्था 1927 पासून सामाजिक कार्यात कार्यरत आहे. या संपूर्ण मंडळाच्या कामकाजाची त्यांनी महिती दिली. यावेळी विशेष उपस्थीती म्हणून ; अभिनव मानव शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. चेतन सारडा, रोटरीचे माजी प्रांतपाल विजयकुमार राठी, बांधकाम व्यावसायिक नितिन मालू यांची उपस्थिती होती. यावेळी माहेश्वरी विद्या प्रसारक मंडळ स्कॉलरशिप कमिटी चेअरमन मनीष भट्टड यांची देखील मोलाचे मार्गदर्शन केले. त्यांनी यावेळी त्यांनी कोणकोणत्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळविता येते, ती कशी मिळते यासंधर्भात मंडळाच्या स्कॉलरशिप बाबत सविस्तर माहिती दिली. यावेळी सूरज मालू, सुहास मालू, यांच्यासह संपूर्ण मालू परिवार उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन सुमन संस्कार स्कुलचे संस्था चालक सचिन मालू यांनी केले.

# सावित्रीबाई फुले विद्यालयात प्रवेशोत्सव

आधुनिक केसरी न्यूज

**पहूर :** येथील महात्मा फुले शिक्षण संस्था संचलित सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालयात विद्यार्थ्यांवर पुष्पृष्टी शाळा प्रवेशोत्सव मोठ्या आनंदात साजरा करण्यात आला. दीर्घ सुटल्यानंतर आज शाळेची घंटा वाजली. विद्यार्थ्यांच्या किलबिलाटाने शालेय परिसर गजबजुन गेला. पहिल्याच दिवशी आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके वाटप करण्यात आली. मधल्या सुट्टीत विद्यार्थ्यांनी जिलेबीचा आस्वाद घेतला. शिक्षकांनी पुष्पवृष्टी करत विद्यार्थ्यांचे स्वागत केले. नवागत विद्यार्थ्यांचे गुलाब पुष्प देऊन कौतुक केले. मुख्याध्यापिका व्ही. व्ही. घोंगडे, पर्यवेक्षिका के. ए. बनकर यांच्यासह सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकांचे वितरण केले. सांस्कृतिक प्रतिनिधी शंकर भामेरे यांनी सूत्रसंचालन केले. क्रीडा शिक्षक एच. बी. राऊत यांनी आभार मानले. नवी पुस्तकं पाहून विद्यार्थ्यांचा आनंद द्विगुणीत झाला होता.

# तुळजाभवानी मंदिरासमोर घंटानाद आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज



**तुळजापूर :** तुळजाभवानी मंदिरात घोटाळे करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपिठाने देऊन एक महिना उलटला आहे; मात्र अद्यापही प्रशासनाकडून गुन्हेगारांवर गुन्हे दाखल करण्यात आलेले नाहीत. त्याच्या निषेधार्थ आज श्री तुळजाभवानी मंदिराबाहेरील मंदिराच्या प्रशासकीय कार्यालयासमोर हिंदुत्वनिष्ठ आणि समविचारी संघटनांनी घंटानाद आंदोलन केले. यावेळी 'श्री तुळजाभवानी पुजारी मंडळा'चे माजी अध्यक्ष श्री. किशोर गंगणे, 'पुजारी मंडळा'चे सदस्य श्री. विजय भोसले, 'जनहित संघटने'चे महाराष्ट्र संस्थापक अध्यक्ष श्री. अजय (भैय्या) साळुंके, 'शिवबाराजे प्रतिष्ठान'चे संस्थापक अध्यक्ष अर्जुन साळुंखे, 'हिंदु जनजागृती समिती'चे सर्वश्री राजन बुणगे, अमित कदम, विनोद रसाळ, सर्वोत्तम जेवळीकर, संदीप बगडी, सुरेश नाईकवाडी, किरण लोंढे, सूरज लोंढे, श्रीमती पुनाताई होरडे, सौ. कल्पना क्षीरसागर यांसह मोठ्या संख्येने भक्त उपस्थित होते. वर्ष १९९१ ते २००९ या कालावधीत श्री तुळजाभवानी मंदिरात ८ कोटी ४५ लाख ९७ हजार रुपयांचा दानपेटी घोटाळा झाला होता. राज्य गुन्हे अन्वेषण विभागाच्या अधीक्षक चौकशी समितीने लिलावदार, मंदिर कर्मचारी, विश्वस्त, शासकीय अधिकारी-कर्मचारी आदी १६ जणा दोषी ठरवले होते; मात्र त्यांच्यावर अनेक वर्षे झाली, तरी कायदेशीर कारवाई होत नव्हती. तेव्हा ९ मे या दिवशी उच्च न्यायालयाने तात्काळ तुळजापूर पोलीस ठाण्यात फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे आदेश दिले आहेत; मात्र त्याला एक महिना उलटला तरीही प्रशासन निष्क्रिय असून अद्यापपर्यंत दोषींवर गुन्हे नोंद झालेले नाहीत. या प्रकरणात दोषींवर तात्काळ गुन्हे नोंद करावेत, या मागणीसाठी श्री तुळजाभवानी मंदिर परिसरात घंटानाद आंदोलन करण्यात आले. या वेळी उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार गुन्हे नोंद केले नाहीत; तर न्यायालयात अवमान याचिका दाखल करू, तसेच राज्यभर तीव्र आंदोलन करू, असा इशारा हिंदु जनजागृती समितीचे राजन बुणगे यांनी दिला आहे.

# संजय गांधी विद्यालयात गुणवंत विद्यार्थी सत्कार; शालेय शिक्षकांसोबत विद्यार्थिनींची उपस्थिती

आधुनिक केसरी न्यूज

**पिशोर :** शहरातील संजय गांधी उर्दू माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात दहावी व बारावी परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. अध्यक्षस्थानी पर्यवेक्षिका शेख नाजिया तर प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे संचालक डॉ. अय्युब सिद्दीकी, फेरोज शेख, मुजीब शेख, रफिक शेख, रफिक मन्सूरी, शकील फकीर होते. मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. दहावीतुन शेख शबनम फेरोज, महेवीश नाजीम खान, शिफा नसर खान, तर बारावी कला शाखेतून महेवीश मुनव्वर शेख, सय्यद मिसबा मुस्तकीम, सय्यद बुशरा चांद अली तसेच विज्ञान शाखेतून शेख बुशरा निसार, जिया फातेमा मुजीब शेख, जिया फातेमा रफिक शेख व युसरा रफिक मन्सूरी यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक पटकवला. या बद्दल त्यांच्या विविध पारितोषिक देऊन गौरव करण्यात आला. यावेळी डॉ. अय्युब सिद्दीकी, शेख नाजिया, प्रा. शेख नुरुन्नीसा , प्रा. मुबीन पटेल, प्रा. शेख सबाकौसर, प्रा. इनामदार फौजीयाजबीन यांनी आपले मनोगत व्यक्त केले. चिस्ती आजम यांनी सूत्रसंचालन करून आभार व्यक्त केले. यावेळी शेख सीमा नाजनीन, फहीम सुलताना, मगदूम फारुकी, गयास शेख, मुजीब शेख, हाफिज खान, इम्रान शेख, अलीमोद्दीन हकीम, नय्यर खान, नविद शेख, अकील पटेल, घनशाम चव्हाण, पालक व विद्यार्थी यांची उपस्थिती होती.



# 'एआय'ला घाबरुन नैराश्यात जाऊ नका

## लोहार समाजातील गुणवंतांच्या सत्कारप्रसंगी देवचक्के यांचे प्रतिपादन

आधुनिक केसरी न्यूज

**अहमदनगर :** एआय या नवीन तंत्रज्ञानामुळे अनेकांना नोकऱ्या गमावण्याचा धोका आहे. मात्र 'एआय' या तंत्रज्ञानाला घाबरुन नैराश्यात जाऊ नये, तर आपल्यात असलेले 'ओरिजनल इंटेलिजन्स' (ओआय) विकसित करणे गरजेचे आहे. त्यासाठी आपल्याला कोणत्या विषयात आवड, रुची आहे कोणत्या विषयाचा अभ्यास आपण करू शकतो. याचे आठवीपासून ध्येय निश्चित करून त्याच क्षेत्रात आपण मास्टरकी मिळवली, तर तेच आपले 'ओरिजनल इंटेलिजन्स' असेल आणि इतरांसाठी ते 'एआय' असेल, असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार तथा सुरभि हॉस्पिटलचे चेअरमन अनिरुध्द देवचक्के यांनी केले. लोहार यूथ फाउंडेशनतर्फे आयोजित समाजातील गुणवंताचा गौरव व वधू-वर परिचय कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी सेवानिवृत्त प्राचार्य सुभाष कौसे हे होते. व्यासपीठावर साहित्यिक अनिल उदावंत, जिल्हा परीषदेचे शिक्षणाधिकारी बाळासाहेब बुगे, सीएसआरडीचे संचालक सुरेश पठारे, राहुरीचे दशरथ पोपळघट, खोसपुरीचे सरपंच सोमनाथ हारेर, महापारेषणचे अभियंता दीपक आगळे, स्टेट बँकेचे व्यवस्थापक पद्माकर धकाते, रोहित जवणे आदी उपस्थित होते. प्रास्ताविक लोहार यूथ फाउंडेशनचे किशोर सोनवणे यांनी केले.पाहुण्याचा परिचय लोहार यूथ फाउंडेशनचे कार्याध्यक्ष हर्षल आगळे यांनी करुन दिला. विद्यार्थ्यांना करिअर बाबत मार्गदर्शन करताना देवचक्के म्हणाले, तप्त लोखंडावर घणाचे घाव घालून लोखंडाला आकार देणारा लोहार समाज आहे. नेमका घाव कुठे घालायचा हे या समाजाला चांगलेच माहिती असते. सध्याच्या मोबाइल युगात संवाद हरवत चालला आहे. त्यामुळे असे कार्यक्रम होणे गरजेचे आहे. 'एआय'सोबत स्पर्धा करण्यासाठी आपलं व्यक्तिमत्त्व असं विकसित करा की तुमच्या आजुबाजुला घडणाऱ्या प्रत्येक गोष्टीचं आकलन तुम्हाला झालं पाहिजे, त्यासाठी वाचन, संवाद वाढवावा लागेल. तुमच्या आयुष्यात भेटणाऱ्या प्रत्येक माणसांकडनं तुम्हाला काहीतरी नवीन शिकण्याचा प्रयत्न करावा लागेल. तुमच्या बोलण्यात नम्रता आहे. हे समोरच्या व्यक्तिला जाणवलं पाहिजे, तरच तो तुम्हाला माहिती देईल. या पद्धतीने आपल्या आयुष्यात बदल केले, तर कितीही प्रगत तंत्रज्ञान आलं तर तुमची संघर्ष करण्याची मानसिक तयारी होईल. सीएसआरडीचे पठारे यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना आपले ध्येय निश्चित करुन वाटचाल करण्याचे आवाहन केले. शिक्षणाधिकारी बुगे यांनी अभ्यासक्रमाबाबत माहिती दिली. उदावंत, प्रा. कौसे यांनी विद्यार्थ्यांना योग्य अभ्यासक्रमाची निवड करुन उच्च पदस्थ होण्याचे आवाहन केले. या कार्यक्रमात दहावी, बारावी, तसेच स्पर्धा परीक्षेत यश मिळवलेल्या ४५ विद्यार्थी-विद्यार्थिनींचा प्रशस्तीपत्र, स्मृतिचिन्ह, गुलाबपुष्प देऊन गौरव करण्यात आला. नगरसह जळगाव, नाशिक, पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर या जिल्ह्यांतील ३५ वधू-वरांचा परिचय सोहळा झाला. या कार्यक्रमाला जिल्ह्यातील समाजबांधव व महिलासंह, नगर, पुणे, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, धुळे येथील लोहार यूथ फाउंडेशनचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. सुत्रसंचालन शिक्षक संजय इघे, सोनवणे यांनी केले.





# शोभायात्रेत बांधवांना शीतपेयाचे वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** महेश नवमीनिमित्त शहरातून निघालेल्या शोभायात्रेचे गांधी चौक येथे यंग चांदा ब्रिगेडच्या वतीने स्वागत करण्यात आले. यावेळी शोभायात्रेत सहभागी समाज बांधवांना यंग चांदा ब्रिगेडच्या वतीने शीतपेयाचे वाटप करण्यात आले.
यावेळी यंग चांदा ब्रिगेडचे रशिद हुसेन, विश्वजित शहा, चंद्रशेखर देशमुख, राम जंगम, सायली येरणे, वंदना हजारे, कालिदास धामनगे, कैलास धायगुने, कार्तिक बोरेवार, महेश गहुकर यांच्यासह यंग चांदा ब्रिगेडचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरवर्षीप्रमाणे यंदाही चंद्रपूरात महेश नवमी समाज बांधवांच्या वतीने मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी संध्याकाळी शोभायात्रा काढण्यात आली. लक्ष्मी नारायण मंदिर येथून या शोभायात्रेला सुरुवात झाली. सदर शोभायात्रेचे स्वागत करण्यासाठी यंग चांदा ब्रिगेडच्या वतीने गांधी चौक येथे स्वागत मंच उभारला होता. ही शोभायात्रा यंग चांदा ब्रिगेडच्या स्वागत मंचाजवळ पोहोचताच यंग चांदा ब्रिगेडच्या वतीने शोभायात्रेचे स्वागत करण्यात आले. यावेळी शोभायात्रेत सहभागी समाज बांधवांना यंग चांदा ब्रिगेडच्या पदाधिकाऱ्यांनी शीतपेयाचे वाटप केले.

# पोस्टल संस्था स्वभांडवली करण्याचा संचालक मंडळाचा प्रयत्न स्वागतार्ह

आधुनिक केसरी न्यूज

**अहमदनगर :** अहमदनगर डिस्ट्रिक्ट नॅशनल पोस्टल को ऑप क्रेडिट सोसायटीची आठवी वार्षिक सर्वसाधारण सभा संस्थेचे अध्यक्ष नामदेव डेंगळे यांच्या अध्यक्षतेखाली राज पॅलेस कॉन्फरन्स हॉल याठिकाणी संपन्न झाली.
संस्थेचे कार्यकारी संचालक श्री राधाकिसन मोटे पाटील यांनी सभेची नोटीस व आर्थिक पत्रके सभागृहापुढे ठेवली.
संस्थेचे सभासद संतोष यादव यांनी संस्थेच्या आर्थिक पत्रकाविषयी सविस्तरपणे मार्गदर्शन करत, संस्थेकडे आज अखेर कॅशक्रेडिट नसतानाही, संस्था उपलब्ध निधीमधून आपल्या सभासदास संस्थेच्या मंजूर उपविधिनुसार सर्वसाधारण कर्ज,अवघ्या नऊ टक्के व्याजदरात उपलब्ध करून देत असून, सातत्याने सभासदहितास प्राधान्य देत काम करत आहे. संस्थेच्या अवघ्या आठ वर्षेच्या कार्यकाळामध्ये कमीतकमी व्याजदरात स्वभाडवलातून अधिकाधिक कर्ज उपलब्ध करून देणारी संस्था म्हणून आपला नावलौकिक निर्माण केला आहे.
ही बाब आपणा सर्वांच्या दृष्टीने अत्यंत गौरवशाली बाब आहे.
यामप्रसंगी रामभाऊ लांडगे, अमित देशमुख, वाय. पी. साळवे, के. एम. कुमठेकर, एकनाथ ताकपेरे यांनी आपल्या मनोगत व्यक्त केले. संस्थेचे चेअरमन नामदेव डेंगळे,संघटनेचे राज्याचे कार्याध्यक्ष संतोष यादव, संदिप कोकाटे, अमित देशमुख,रामभाऊ लांडगे, वाय. पी. साळवे, के. एम. कुमठेकर यांचे हस्ते सभासदाच्या पस्तीस गुणवंत पाल्याचा गौरव व सेवानिवृत्त सभासद श्रीमती वासंती नगरकर निलिमा कुलकर्णी यांचा तर संचालक म्हणून काम पाहिलेले संजय बोदर्डे,रावसाहेब चौधरी,प्रकाश कदम,श्रीमती जे पी गटणे,श्रीमती एच आर मगर, यांचा सत्कार करण्यात आला.
संस्थेचे अध्यक्ष नामदेव डेंगळे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, आजवर आपण सर्वांनी जे सहकार्य केले त्यामुळे संस्था नेत्रदिपक प्रगती करू शकली,हे नमूद करत सर्वाना धन्यवाद देत,आजच्या सभेत घेतलेले सर्व निर्णयाची अंमलबजावणी संचालक मंडळ निश्चितच करील.
आपण सर्वांनी आजवर जे सहकार्य केले त्याबद्दल धन्यवाद देत,आगामी काळात असेच सहकार्य करावे अशी अपेक्षा व्यक्त केली. यावेळी राधाकिसन मोटे, प्रकाश कदम, ,प्रदिप सूर्यवंशी, तान्हाजी सूर्यवंशी, पी.ए. चौगुले,मोनाली कर्डिले, अश्विनी चिंतामणी, प्रितम वराडे अशोक बंडगर,अमोल साबळे, सचिन गायकवाड, कमलेश मिरगणे यांचेसह दिपक नागपुरे, दिपक कुंभारे, सुनिल थोरात, विजय चाबुकस्वार,विजय दंरदले, सविता ताकपेरे, निशा उदमले, प्रियांका भोपळे,वंदना नगरकर, सागर पंचारिया, आसिफ शेख,आबा उनवणे,सागर बोरुडे,लक्ष्मीकांत दंडवते, धनंजय दैठणकर, संभाजी बसवेकर यांच्यासह सभासद उपस्थित होते. कार्यक्रमाचे स्वागत गीत सौ वंदना नगरकर यांनी सादर केले. प्रास्ताविक संतोष यादव सूत्रसंचालन तान्हाजी सूर्यवंशी तर आभार सचिन गायकवाड यांनी केले.

# पूरस्थितीचा सामना करण्यास प्रशासन सज्ज

## पूरप्रवण भागात प्रशिक्षण पूर्ण

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** जिल्ह्याला पुराचा इतिहास आहे. येत्या पावसाळ्यात खबरदारीची उपाययोजना म्हणून जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांच्या सूचनेनुसार जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण चंद्रपूर व राज्य आपत्ती प्रतिसाद दल (SDRF) नागपूर, यांच्या संयुक्त विद्यमानाने पूरप्रवण क्षेत्रातील तालुक्यात मान्सून पूर्वतयारीचे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते.
पहिल्या टप्प्यात वरोरा भद्रावती, राजुरा, कोरपना आणि जिवती ह्या तालुक्यातील पूरप्रवण भागातील ग्राम स्तरावर तसेच तालुकास्तरावर असणाऱ्या लोकांचे प्रशिक्षण पूर्ण झाले आहे.
या प्रशिक्षणासाठी त्या तालुक्यातील ग्रामसेवक, तलाठी, मंडळ अधिकारी उपस्थित होते. यावेळी जिल्ह्यातील आणि तालुक्यातील तसेच त्या त्या भागात राहणाऱ्या आपदा मित्रांनाही प्रशिक्षण देण्यात आले. सदर प्रशिक्षणासाठी नागपूर येथील राज्य आपत्ती व्यवस्थापन प्रतिसाद दल (एस.डी.आर.एफ.) दलाचे पोलिस निरीक्षक डी. जी. दाते यांच्यासह 13 लोकांची टीम, राजुराचे उपविभागीय अधिकारी रविंद्र माने, तालुक्यातील प्रशिक्षणाच्या ठिकाणी संबंधित तहसीलदार योगेश कवटकर (वरोरा), अनिकेत सोनवणे (भद्रावती), प्रकाश व्हटकर (कोरपना) तसेच जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सलीम शेख उपस्थित होते. पूरप्रवण भागात अशा प्रकारचे प्रशिक्षण राबवण्याचे आदेश जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. यांनी दिले होते. तसेच निवासी उपजिल्हाधिकारी संजय पवार यांच्या निर्देशान्वये सदरील प्रशिक्षणाच्या ठिकाणी तालुक्यातील अधिकारी - कर्मचारी व ग्राम स्तरावरील पट्टीचे पोहणारे तसेच त्या ठिकाणच्या स्थानिक नागरिकांना बोलावून प्रशिक्षण देण्याचे निर्देश देण्यात आले होते.
यावेळी जिल्ह्यातील विविध तालुक्यांना रबर बोट, शोध व बचाव पथकासाठी लागणारे बचाव साहित्य वितरित करण्यात आले. जिल्ह्यांमध्ये सध्या विविध ठिकाणी 28 बोट तैनात आहेत. त्यामध्ये रबर बोट व तसेच एचडीपी बोर्डचा ही समावेश आहे.
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाकडे पोलिस विभाग व इतर विभागातील प्रशिक्षित शोध व बचाव दल तैनात असून त्यामध्ये प्रशिक्षित बोट चालक व आपत्ती शोध अनुकर्ते शामील आहेत. त्याचबरोबर जिल्ह्यामध्ये 300 आपदा मित्र हे त्यांच्या मदतीसाठी प्रशिक्षण देऊन तयार आहेत.



**या बाबींचे मिळाले प्रशिक्षण :** या प्रशिक्षणामध्ये बोट चालवणे, बोटवर कशाप्रकारे लोकांना रेस्क्यू ऑपरेशन केलं जातं त्याबद्दलची माहिती, तसेच टाकाऊ वस्तुपासून म्हणजेच इम्प्रोवाईज फ्लोटिंग डिव्हाइसेस च्या वापरापासून पुरामध्ये अडकल्यानंतर आपले जीव कसे वाचवायचे व पूर परिस्थितीमध्ये मदत मिळेपर्यंत जीव कसे वाचवायचे याबद्दलचे प्रशिक्षण त्या ठिकाणी देण्यात आले आहे . चंद्रपूर महानगरास इराई नदीच्या पाण्यापासून पूर परिस्थिती निर्माण होते . ही परिस्थिती निर्माण होऊ नये याकरिता जिल्हाधिकारी श्री . गौडा यांनी इरई नदी स्वच्छ करण्याचे आदेश दिले होते त्यानुसारच इरही नदी परिसरातील वाढलेली झाडे व झुडपे काढण्याचे काम पूर्ण झालेले आहे .

# देऊळगाव महीत प्रवासी निवारा करावा

## भाजपा शहराध्यक्ष राऊत यांचे जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**देऊळगाव राजा :** पुणे नागपूर राष्ट्रीय महामार्गावरील देऊळगाव मही या गावात बस स्थानक तर दूरच प्रवासी निवारा पण बांधण्यात आला नाही. परिणामी प्रवाशांचे हाल होत असून या ठिकाणी किमान प्रवासी निवारा तात्काळ बांधा अन्यथा अन्नत्याग आंदोलन करू असा निर्वाणीचा इशारा बस स्थानका साठी सातत्याने लढा देणारे भाजप शहराध्यक्ष कैलास राऊत यांनी दिला आहे. देऊळगाव मही शहरांमधून दररोज शेकडो प्रवासी शेगाव अमरावती जालना बुलढाणा संभाजीनगर सह इतर गावांना आपल्या दवाखान्यासाठी व इतर कामासाठी जातात, तसेच गरोदर माता वयोवृद्ध पुरुष महिला शाळेत जाणारे विद्यार्थी देऊळगाव मही मधून प्रवास करतात जवळपास ५० खेडे देऊळगाव मही शहराला जोडलेले आहे. प्रवाशांची गर्दी असलेल्या या शहरात मात्र प्रवाशांच्या सोयीसाठी बस स्थानक अथवा प्रवासी निवारा नाही ही एक शोकांतिका आहे.दे.मही शहरात 50/3 अ. मध्ये मुख्य मार्गा लगत ग्रामपंचायतच्या मालकीची ०.८१ आर जमीन आहे या जमिनीमध्ये किंवा ग्रामपंचायतला ज्या ठिकाणी जागा उपलब्ध करता येईल त्या ठिकाणी प्रवाशांना गाडी येईपर्यंत सुसज्ज व चांगल्या प्रकारचा प्रवासी निवारा करावा व प्रवाशांच्या जीवाशी खेळणे थांबवावे अशी मागणी भाजप शहर अध्यक्ष कैलास राऊत यांनी तहसीलदार यांच्या मार्फत जिल्हाधिकारी यांच्याकडे केली आहे. त्यांच्या मागणीवर प्रशासन सकारात्मक नसल्यावर येत्या १३ ऑगस्ट लोकशाही दिनापासून अन्नत्याग आंदोलन छेडण्याचा इशारा श्री राऊत यांनी दिला आहे.

# गेटेड बंधाऱ्यांची आ.किशोर जोरगेवार यांनी केली पाहणी

## शेकडो हेक्टर शेतीच्या सिंचनाचा प्रश्न सुटेल; भूजल पातळीत होणार वाढ

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** आमदार किशोर जोरगेवार यांच्या मागणी नंतर जलसंधारण विभागाने उपलब्ध करून दिलेल्या १२ करोड रुपयांच्या निधीतून विचोडा रयतवारी, जूनी पडोली, अंतुर्ला येथे बंधा-र्यांचे काम करण्यात आले आहे. दरम्यान आमदार किशोर जोरगेवार यांनी विचोडा रय्यतवारी आणि जुनी पडोली येथील बंधा-र्यांच्या कामाची पाहणी केली आहे. सदर काम पुर्ण झाले आहे. या बंध-यामुळे येथील शेकडो हेक्टर शेतीच्या सिंचनणाचा प्रश्न सुटणार आहे.

यावेळी जुनी पडोलीचे उपसरपंच सुनिता नागरकर, भास्कर नागरकर, देवानंद नागरकर, दादाजी वाढई, नथ्थु वाडगुरे, विकास वाढई, ग्रामपंचायत सदस्य सुभाष आवळे, यंग चांदा ब्रिगेडचे ग्रामीण तालुका अध्यक्ष राकेश पिंपळकर, छोटा नागपूर उपसरपंच रिषभ दुपारे, प्रतिक्षा ठावरी, रंजुदेवी विश्वर्कमा, कुंटा वाघमारे, मुद्रीका कस्तुरे, गीता मासिरकर, संजय बोबडे, गणेश दिवसे, शोभा दिवसे, सविता बोबडे, ज्ञाणेश्वर पिंगे, पिंटु देवगडे, संदेश साव आदींची उपस्थिती होती.

आरोग्य, शिक्षण आणि शेती या तिनही विषयांवर आमदार किशोर जोरगेवार यांचे विशेष लक्ष राहिले आहे. या क्षेत्रातील प्रश्न सोडविण्यासाठी आमदार किशोर जोरगेवार यांनी मोठा निधी खेचून आणला आहे. या अगोदर आमदार किशोर जोरगेवार यांनी चंद्रपूर तालुक्याला कापूस उत्पादक तालुका घोषीत केला आहे. तसेच सिएस टीपीएस च्या राखेमुळे शेतपिकांचे नुकसान होत होत होते. सदर राख नाल्यात जमा झाल्याने. सदर दुषीत राख शेतक-यांच्या शेतात जात होती. त्यामुळे आमदार किशोर जोरगेवार यांनी सदर नाल्याचे खोलीकरण करण्यात आले होते. परिणामी हा प्रश्न सुटला. ग्रामीण भागातील पाणी प्रश्न सुटावा यासाठी आमदार किशोर जोरगेवार यांचे सातत्याने प्रयत्न सुरु आहे. मोठा निधी या भागात आमदार किशोर जोरगेवार यांनी विविध विकासकामांसाठी खर्च केला आहे. विचोडा रयतवारी, जूनी पडोली, अंतुर्ला लगत असलेल्या गावांचा पाणी प्रश्न सुटावा यासाठी सदर तिन्हीही गावात गेटेड बंधारे तयार करण्यात यावेत अशी मागणी आमदार किशोर जोरगेवार यांनी केली होती. अखेर या कामासाठी जलसंधारण विभागाने १२ कोटी रुपयांचा निधी मंजुर केला होता. या निधीतून या तीनही गावात बंधा-र्यांचे काम करण्यात आले आहे. दरम्यान आमदार किशोर जोरगेवार यांनी विचोडा रय्यतवारी आणि छोटी पडोली येथे भेट देत येथील बंधाऱ्यांची पाहणी केली. या बंधा-याचे काम पुर्ण झाले असून येथील शेकडो हेक्टर शेतीच्या सिंचनाचा प्रश्न सुटला आहे. तसेच या बंधा-यांमुळे विचोडा, जुनी पडोली, छोट नागपूर, अंबोरा



खैरगाव, चांद सुर्ला, लखमापूर आदि गावे जुळल्या गेली आहे. बंधाऱ्यांसाठी निधी उपलब्ध करून दिल्याबदल विचोडा ग्रामपंचायत येथे आमदार किशोर जोरगेवार यांचा सत्कार करत गावकऱ्यांनी त्यांचे आभार मानले. सदर काम उत्तम दर्जाचे झाले आहे. या बंधा-यामुळे गावक-यांना मोठा फायदा होणार आहे. सोबत येथे आणखी काम आपण करणार आहोत. असे यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी म्हलले आहे.



# शाळेच्या पहिल्याच दिवशी केले वृक्षरोपण

## मालोजीराजे भोसले प्राथमिक शाळेचा अभिनव उपक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील वेरुळ येथे शाळेच्या पहिल्याच दिवशी वृक्षारोपण करत शैक्षणिक वर्षाची सुरुवात करण्यात आली. वेरूळ येथील मालोजी राजे भोसले प्राथमिक शाळेच्या पहिल्याच शाळेच्या पहिल्या दिवशी अभिनव उपक्रम राबवून शाळेच्या परिसरात वृक्षारोपन करून झाडे लावा झाडे जगवा असा संदेश देत विद्यार्थ्यांचे स्वागत केले. या कार्यक्रमास प्रमुख पाहूणे आम आदमी पार्टीचे कार्यकर्ते श्री सतिश लोखंडे, सोसायटचे चेअरमन मुलचंद चव्हाण, व्हाईस चेअरमन किशोर काळे, सदस्य शंकर मिसाळ , मा. ग्रा. पं. सदस्य अनिल मिसाळ, शेख रियाज, मुख्याध्यापिका श्रीमती उषा लहाने, पर्यवेक्षक दत्तू बोडखे, संजय गावित, वाय बी पाटील, सागर पाटील, शेख रुकैया, अर्चना बोडखे, शेख राजू यांच्यासह शिक्षक, शालेय विद्यार्थी व गावकरी उपस्थित होते.

# शाळेच्या वेळेत मोबाईल बंद

आधुनिक केसरी न्यूज

**देऊळगाव राजा :** मोबाईल मुळे शैक्षणिक कार्यात अडथळा येऊ नये, जिल्हा परिषदेच्या शाळांची शैक्षणिक प्रगती व्हावी म्हणून शाळेच्या वेळेत शिक्षक आपली मोबाईल बंद ठेवतील असा स्वागतहार्य निर्णय शिक्षक संघटनांनी घेतला आहे. जिल्हा परिषद शाळांची पटसंख्या वाढावी पालकांचा दर्जेदार शिक्षणाकडे असणारा कल, तसेच जिल्हा परीषद शिक्षकांची समाजात प्रतिष्ठा वाढावी या दृष्टीने तालुक्यातील सर्व शिक्षक संघटना एकत्र येऊन... गटशिक्षण अधिकारी दादाराव मुसदवाले यांचे मार्गदर्शनाखाली येत्या शैक्षणिक वर्ष पासून काही महत्त्वाचे प्रेरणादायी निर्णय घेतले आहेत. जिल्हा परीषद शाळांचा शैक्षणिक दर्जा उत्तम असून तो आणखी वाढवा, पालकांचा इंग्रजी शिक्षणाकडे वाढता कल त्यामुळे जिल्हा परीषद शाळांची कमी होणारी पटसंख्या यावर अनेक उपाय योजना केल्या जातात. देऊळगाव राजा तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांचा शैक्षणिक दर्जा मागील काही वर्षा पासुन उंचावला आहे... तरीही पालकांच्या वाढत्या अपेक्षा लक्षात घेता शिक्षकांनी एकत्र येऊन शिक्षक संघटनेच्या माध्यमातून स्वयं प्रेरणेने काही निर्णय घेतले आहेत. शालेय वेळेत कोणीही शिक्षक मोबाईल चां व्यक्तिगत वापर करणार नाहीं.... शैक्षणीक कामासाठी अथवा अध्यापनासाठी वापर करायचा असल्यास मुख्याध्यापक यांचे परवानगीने व देखरेखी खाली करता येईल. तसेच पालकांचा इंग्रजी शिक्षणाकडे वाढता कल लक्षात घेता या वर्षीपासुन ई 1ली 2री मध्ये सेमी इंग्रजी सुरु करण्यात येणार आहे.

# खांडीपिंपळगाव-जाफरवाडी-गोळेगाव पुलाचे काम रखडले

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील खांडीपिंपळगाव-जाफरवाडी- गोळेगाव पर्यंत जाफरवाडी वस्ती लगत ठेकेदाराने एकदोन महिन्या पासून पुलाकाम साठी फक्त खड्डा करून ठेवला कामाच्या कुठली हालचाल नसुन काम रखडून आहे.तर सुलतानपूर ते खांडी पिंपळगावपर्यंत रस्ता डांबरीकरण आले तर या दरम्यान भांडे गाव जवळ पुल काम होवून रंगरंगोटी झाली तर खांडीपिंपळगाव येथे ही पुलाचे काम होवून रंगरंगोटी झाली मात्र दोन्ही बाजूंनी ठेकेदाराने खडी मुरुमचा भराव न करता नाममात्र माती टाकून थातुरमातुर काम अटोपले पावसा नंतर चिखल सांडपाणी थांबून ये जा करताना वाहनधारकांची व नागरिकांचे हाल होत आहे.त्यापुढे खांडीपिंपळगाव ते जाफरवाडी वस्ती गोळेगाव व फाट्या पर्यंत रस्ता ठिकठिकाणी फुटून मोठ्या प्रमाणात खड्डे पडले आहे.तर पुल काम रखडून आहे त्यात खड्डे भरण्यासाठी वर्षाभरापासून विभाग अंतर्गत गुत्तेदार करवी खडीचे गंज आणुन टाकले मात्र काम झाले नाही.यापुर्वीही दैनिकाने विभागाला अवगत केले होते परंतु ठेकेदार व विभाग (काम न करता....?) नाही माहित कामच झाले नाही.सार्वजनिक बांधकाम विभाग खुलताबाद शाखाभियंता उपाभियंता यांनी कामांवर लक्ष घालून अंदाज पत्रकांनुसार कामे करुन घेवून वाहनधारक नागरिकांना सवलत सुविधा उपलब्ध करून द्यावे असी मागणी नागरिकांतून होत आहे.



# बल्लारपूर रेल्वे स्टेशनवरील काम पूर्ण करा : डॉ. गावतुरे

आधुनिक केसरी न्यूज

**बल्लारपूर :** बल्लारशा रेल्वेस्थानकावर भूमिपुत्र ब्रिगेडच्या वतीने डॉ. अभिलाषा गावतुरे यांच्या नेतृत्वात मोठ्या संख्येने लोक एकत्र आले होते व रेल्वे प्रबंधकांना भेटले आणि रेल्वे स्थानकावर असलेल्या सर्व असुविधेबद्दल सांगितले. यात सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे अस्वच्छता. रेल्वे स्थानकावर कचरा असतो, इथले बाथरूम स्वच्छ नाही आहेत. डॉ. अभिलाषा गावतुरे यांनी बल्लारपूर रेल्वे स्टेशनवरील सुविधांची तातडीने सुधारणा करण्याची मागणी केली आहे. बल्लारपूर रेल्वे स्टेशन एक महत्त्वाचे जंक्शन असल्यामुळे, शहराला लागून असलेल्या अनेक शहरातील लोक प्रवासासाठी येथे येतात. येणाऱ्या प्रवाशांना चांगल्या सुविधा मिळाव्यात म्हणून हे निवेदन देण्यात आले. बल्लारपूर रेल्वे स्टेशनवर पावसाळ्यात स्वच्छतेची नीट व्यवस्था नसल्यामुळे प्लॅटफॉर्म आणि प्लॅटफॉर्म लाईनमध्ये कचरा राहतो आणि नाल्यांवरून दूषित पाणी वाहते, ज्यामुळे प्रवाशांना असुविधा होते. रोज स्वच्छता नीट करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली. बल्लारपूर शहर आणि आसपासचे अनेक लोक तेलंगणात आंध्र प्रदेशमध्ये जाण्यासाठी या स्टेशनचा वापर करतात. परंतु, अधिक ट्रेन न मिळाल्यामुळे प्रवास करताना त्रास होतो. तेलंगणातून येणाऱ्या पॅसेंजर ट्रेनचे वेळापत्रक सुधारून शिरपूर, कागजनगर येथे 12:30 येते, मात्र बल्लारपूर स्टेशनवर 15:30 वाजता येते. जेंव्हा की एक तासात पोहचायला हवी. भाग्यनगर-नागपूर-काजीपेट ट्रेन सेवा पुन्हा सुरू करावी. सर्व सुपरफास्ट आणि एक्सप्रेस ट्रेनमध्ये फक्त पुढे एक आणि मागे एक जनरल बोगी असते. त्यामुळे प्रवाशांना गर्दीमुळे अपघात होण्याची शक्यता असते. सर्व ट्रेनच्या पुढे दोन आणि मागे दोन किंवा त्यापेक्षा अधिक जनरल बोगी वाढवण्यात याव्यात.

प्लॅटफॉर्मवर चालू असलेले शेडचे काम आणि प्लॅटफॉर्म 1 वरील पुलाचे काम लवकर पूर्ण करावे. प्रतीक्षा जागा लहान असल्यामुळे प्रतीक्षा आणि पार्किंगच्या जागेची व्यवस्था करण्यात यावी. 27 नोव्हेंबर 2022 रोजी झालेल्या पुलाच्या दुर्घटनेप्रमाणे घटना पुन्हा होऊ नये, म्हणून दुरुस्तीचे काम लवकर पूर्ण करावे. तिकीट काउंटरवर सुटे पैसे नसल्यामुळे तिकीटासाठी



अधिक पैसे जातात. यावर तातडीने कारवाई करावी. डॉ. अभिलाषा गावतुरे यांनी मागण्या लवकरात लवकर पूर्ण करण्यात याव्यात, अन्यथा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. रोजीना शेख, लता नागोसे, वैशाली भुरसे, आयशा मालाधारी, सोनी झीगारे, प्रीती मोहूर्ले, गायत्री गावतुरे, लता नागोसे, करुणा शेगावकर, रामा चित्तलवार ताहेर हुसैन, अतीक शेख, बशीर खान, आफताब पठान, साजिद शेख, मोइनुद्दीन, गौस शेख, अजय शाह, सिराज भाई, श्रीकांत, मुशर्रफ भाई, शिव शंकर राजभर यांसह असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.




# वखरल्या भुईवर वांझोटा वारा.. कधी बरसती पाऊसधारा..!

## भोकरला पेरण्या खोळंबल्या : बळीराजा चिंतातूर

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** यंदाचा पाऊस बळीराजा साठी 'संजीवनी' ठरणार असल्याचे भाकीत हवामान विभागाने केल होत. खरीपाची पेरणी करण्यासाठी बळीराजाने शेतीची मशागत केली. मृग नक्षत्र संपत आले तरी वरूणराजा प्रसन्न झाला नाही. रानात वखरलेल्या भूईवर नुसता वांझोटा वारा हैदोस घालतो आहे. पेरण्या खोळंबल्याने कधी बरसती पाऊस धारा असं म्हणत शेतकऱ्यांच्या नजरा आकाशाकडे टक लावून आहेत. बहूतांशी शेतकऱ्यांनी यंदा समाधानकारक पाऊस होणार असल्याने पूर्व पावसाळी कामे आटोपून काळ्या आईची ओटी भरण्यासाठी मशागत केली.पेरणीसाठी आवश्यक असलेली बि-बियाणे,खत खरेदीसाठी बाजारपेठेत गर्दी केली.अव्वाच्या सव्वा दरात महागडे बियाणे खरेदी करून ठेवली. रोहिणी नक्षत्र कोरडे गेले त्यापाठोपाठ मृग नक्षत्र संपत आले तरी वरूणराजा काही प्रसन्न होत नाही.ज्यांच्याकडे बागायतीची सोय आहे त्यांनी पेरणी केली आहे.तालुक्यातील तेलंगणा सिमालगतच्या काहि भागातील शेतकऱ्यांनी पावसाच्या भरवशावर धूळ पेरणी केली आहे.कृषी विभागाने शंभर मिलीमीटर पाऊस झाल्याशिवाय पेरणी करू नये असे आवाहन केले असल्याने शेतकऱ्यांनी पेरणी केली नाही.मागील आठवड्यापासून उकाडा वाढला असून आकाशात केवळ ढगांची गर्दी होताना दिसते आहे. प्रामुख्याने मृगातील पाऊस हा पेरणीसाठी लाभदायक ठरत असल्याने "मृगाच्या पेरा अन् सोन्याचा तूरा" असं म्हटलं जात. पाऊस दरवर्षी अशीच हूलकावणी देत असल्याने बळीराजाचे स्वप्न धूळीस मिळत आहे.मृगसरी कधी बरसणार यांची उत्सुकता चिंतातुर झालेल्या बळीराजाला लागली आहे.

# जि.प. केंद्रीय प्राथमिक शाळा आपेगाव येथे प्रवेशोत्सव साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा आपेगाव तालुका पैठण जिल्हा छत्रपती संभाजी नगर दिनांक 15 जून 2024 रोजी शाळेचा पहिला दिवस म्हणजेच प्रवेशोत्सव साजरा करण्यात आला. सकाळी ठीक सात वाजता गावामधून प्रभात फेरीचे आयोजन करण्यात आले प्रभात फेरी मधून मुलांना शाळेत येण्यासाठी विविध घोषणा देऊन आवाहन करण्यात आले त्यानंतर सर्व मुले शाळेच्या मैदानात आली आणि कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली.



कार्यक्रमाचे सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले त्यानंतर मुलांचे कौतुक आणि नवीन शैक्षणिक वर्षाच्या शुभेच्छा देऊन स्वागत करण्यात आले इयत्ता पहिलीतील मुलांचे स्वागत करून त्यांना मान्यवरांच्या हस्ते पाठ्यपुस्तकाचे वाटप करण्यात आले त्यानंतर वर्ग दुसरा तिसरा चौथी पाचवा सहावा आणि सातवा वर्गातील विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकाचे वाटप करण्यात आले आणि पुढील शैक्षणिक वर्षाकरिता आपेगाव केंद्राचे केंद्रप्रमुख आदरणीय श्री उत्तम खरात सर यांनी मार्गदर्शन केले त्यानंतर शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती खोसे मॅडम यांनी मुलांना शुभेच्छा पर मार्गदर्शन केले तसेच गावातील सरपंच श्री पांडुरंग औटे यांनी सुद्धा मुलांना शुभेच्छा दिल्या. सर्व विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करून प्रवेशोत्सव मेळाव्याची सांगता करण्यात आली या कार्यक्रमासाठी अध्यक्ष स्थान म्हणून शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती खोसे मॅडम यांनी पाहिले या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून आपले गाव केंद्राचे केंद्रप्रमुख आदरणीय श्री उत्तम खरात सर होते. तसेच गावचे सरपंच श्री पांडुरंग औटे उपसरपंच श्री वसीम भाई शेख ग्रामपंचायत सदस्य तसेच शाळा समितीचे अध्यक्ष श्री विठ्ठल राव वाघ उपाध्यक्ष श्री ज्ञानेश्वर भाऊ आवटे शाळा व्यवस्थापन समिती सदस्य व पालक कमिटीचे अध्यक्ष उपाध्यक्ष व पालक वर्ग आणि गावातील ग्रामस्थ या कार्यक्रमासाठी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री बहिर सर यांनी पाहिले तसेच या कार्यक्रमाचे आयोजन श्री बडसल सर श्रीमती मारवाडी मॅडम श्रीमती पालवे मॅडम श्रीमती जराड मॅडम श्रीमती डाके मॅडम श्रीमती घोडेचोर मॅडम यांनी केले.

# शेतकऱ्यांना ५६ कोटींहून अधिक वीजबील सवलतीचा लाभ

## कृषीमंत्री धनंजय मुंडे यांची माहिती

आधुनिक केसरी न्यूज

**बीड :** शासनाने जिल्ह्यात दुष्काळसदृश्य स्थिती जाहीर कैल्याने शेतकऱ्यांना आतापर्यंत ५६ कोटी ८० लाख रुपये वीज बिल सवलत दिली. यातून वंचित राहिलेल्या ३६ हजार शेतकऱ्यांना हा लाभ देण्याचा सकारात्मक निर्णय घेतला आहे. त्याची पूर्तता करण्याचे निर्देश राज्याचे कृषिमंत्री व बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी आज दिले.

जिल्ह्यातील वीज वितरण व अनुषंगिक बाबींचा आढावा पालकमंत्री जिल्हाधिकारी यांनी आज कार्यालयात झालेल्या एका बैठकीत घेतला. या बैठकीस माजलगावचे आमदार प्रकाश सोळंके, आष्टीचे आमदार बाळासाहेब आजबे, जिल्हाधिकारी दिपा मुधोळ- मुंडे, जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी अविनाश पाठक तसेच वीज वितरण कंपनीचे अधिकारी अभियंता एम.डी. घुर्मे, कार्यकारी अभियंता अ.ना.पाटील तसेच इतर अधिकारी यांची उपस्थिती होती. जिल्ह्यात यावर्षी दोन्ही हंगामात पावसाअभावी पिकांची स्थिती खराब राहीली असल्याने शासनाने संपूर्ण बीड जिल्हा दुष्काळ सदृश्य स्थितीचा जिल्हा घोषित केला. यातील तरतुदीनुसार शेतकऱ्यांना ३३ टक्के वीज बिल माफीचा निर्णय शासनाने घेतला होता. जिल्ह्यात असलेल्या एक लाख ८३ हजार २८२ कृषी जोडण्यापैकी १ लाख ४७ हजार शेतकऱ्यांना दर तिमाही २८ लाख ४० लाख याप्रमाणे सवलत प्रदान करण्यात आली आहे. दोन तिमाही एकूण ५६ लाख ८० हजाराची सवलत शेतकऱ्यांना मिळाली आहे. उर्वरित ३६ हजाराहून अधिक शेतकऱ्यांना लाभ द्यायचा बाकी आहे. शासन याबाबत सकारात्मक आहे. व हा लाभ त्या सर्व शेतकऱ्यांना त्वरित देण्याचे निर्देश पालकमंत्री यांनी दिले. आजच्या बैठकीत वीज वितरण कंपनीच्या वाहिनी विलगीकरण तसेच जुन्या तारा बदलणे, रोहित्र बदलणे या नियमित कामासह दुष्काळ सदृश्य स्थितीत दिला गेलेला. लाभ व कृषी वीज पुरवठ्यासाठी जिल्हा नियोजन समितीने दिलेल्या तरतुतीतील कामांचा आढावा घेण्यात आला. जिल्ह्यात विद्युत वाहिनी पुनर्गठण अर्थात आरडीएसएस अंतर्गत विविध कामे प्रस्तावित आहेत. या कामांचा आढावा घेताना ही कामे गतिमान व कालबद्ध पद्धतीने उद्दिष्ट ठरवून पूर्ण करण्याच्या सूचना श्री मुंडे यांनी यावेळी केल्या. विविध तालुक्यात वीज मंडळाचे काम करणाऱ्या बाह्य यंत्रणांची संख्या कमी आहे यामुळे त्वरित खंडित वीज पुरवठा सुरळीत करणे, शक्य होत नाही हे लक्षात घेऊन विभागनिहाय या यंत्रणांची संख्या वाढवून त्वरित सेवा प्रदान करण्याच्या दृष्टिकोनातून वीज वितरण कंपनीने पावले उचलावित. असे पालकमंत्री म्हणाले. कृषी पंप, जोडणी जिल्ह्यात आजमितीस कृषी पंपासाठी वीज पुरवठा मागणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या ४७७० आहे. ही जोडणी मार्च अखेर पूर्ण होणे अपेक्षित असले तरी याला गती देऊन ही सर्व जोडणी डिसेंबर २०२४ पूर्वी पूर्ण करा अशा प्रकारचे निर्दे श श्री मुंडे यांनी यावेळी दिले. शेतकऱ्यांना दिवसा आठ तास व रात्री दहा तास विद्युत पुरवठ्याचे लक्ष समोर ठेवून कामे करा व त्या सर्व कामांना गती द्या, असेही पालकमंत्री यावेळी म्हणाले. कृषी पंप जोडणीतील काही पुरवठा प्रकरणे सौर विद्युत द्वारे पुरवठा झाल्यास सर्व शेतकऱ्यांना वीज उपलब्ध करून देण्याचे शासनाचे प्रयत्न आहेत.

# दरोडेखोरांना अटक करण्याची गावकऱ्यांची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**कंधार :** तालुक्यातील कौठा येथील गजानन येरावार यांच्या घरावर पडलेल्या सशस्त्र दरोड्याच्या निषेधार्थ कौठा बाजार पेठ कडकडीत बंद पाळून घटनेचा व्यापाऱ्यांनी निषेध करून बंद पाळण्यात आले. कौठा येथे तात्काळ पोलीस चौकी स्थापना करा गावात राष्ट्रीय कृत्त बँक उपलब्ध करुन देण्यात यावी दरोडेखोराना तत्काळ अटक करण्याची मागणी व्यापारी गावकऱ्यांनी केली आहे.

कंधार तालुक्यातील कौठा येथील गजानन येरावार यांच्या घरावर दि.१५ जून रोजी पहाटेच्या सुमारास सहा जणांनी सशस्त्र दरोडा टाकून मोठा ऐवज पळवल्याची घटना घडली आहे, दरोडेखोरानी गँस कटरच्या सह्यानी मुख्य दरवाजा तोडून घरातील मौल्यवान वस्तू पळवल्याची घटना घडली. या घटनेच्या निषेधार्थ कौठा बाजारपेठ कडकडीत बंद ठेऊन व्यापाऱ्यांनी निषेध व्यक्त केला. पोलीस निरीक्षक चंद्रकांत जाधव यांना निवेदन देऊन दरोडेखोराना तात्काळ अटक करण्याची मागणी व्यापारी व तसेच गावकऱ्यांनी केली,असता पोलीस निरीक्षक चंद्रकांत जाधव यांनी आरोपींना अटक करण्या साठी विविध पथक तैनात करण्यात आली असून लवकर आरोपींना अटक केले जाईल, असे उपस्थित शिष्टमंडळास सांगितले. यावेळी राजेश पावडे ज्ञानेश्वर वट्टमवार सतिश देशमुख संतोष मोरलवार ज्ञानेश्वर कोत्तावार प्रफुल्ल येरावार साईनाथ महाजन पांडुरंग ओगले रुपेश येरावार आरेष चौधरी गोविंद महाजन बाबुराव येरावार महेश कोत्तावार भानुदास येरावार आदी उपस्थित होते.




गावात राष्ट्रीय कृत्त बँक राहिली असती तर कदाचित हि घटना घडली नसती, गावात राष्ट्रीय कृत्त बँक नसल्याने व्यापाऱ्यांना अनंत अडचणीचा सामना करावा लागतो, गावा पासून १२ किमी अंतरावर मुखेड येथे राष्ट्रीय बँक आहे, सदरील घटने मुळे रक्कम आणायची सुध्दा हिमंत होत नाही, जिव धोक्यात घालून रक्कम आणावी लागते, जिल्हा प्रशासनाने याकडे लक्ष दिल्यास व्यापार्याची अडचण होणार नाही . **ज्ञानेश्वर वट्टमवार, भुसार व्यापारी**

# राज्यात किड्या मुंग्यांप्रमाणे माणसे मरत आहेत, सरकार कुठे आहे : नाना पटोले

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राज्यात दुष्काळाची परिस्थिती गंभीर आहे. राज्याच्या विविध भागात उष्माघाताने अनेकांचा बळी गेला आहे. दुष्काळाने ग्रस्त शेतकरी आत्महत्या करत आहेत. पाण्यासाठी वणवण करताना अनेक माता भगिणींनी आणि लहान मुलामुलींनी जीव गमावला आहे. कंपन्यांमध्ये झालेल्या स्फोट आणि दुर्घटनेत अनेकांचा मृत्यू झाला आहे. गेल्या काही दिवसांमध्ये राज्यात किड्या मुंग्याप्रमाणे माणसे मरत आहेत. पण राज्य सरकार मात्र फक्त टेंडर काढणे, निधी वाटणे आणि कमिशन घेणे यात मश्गूल आहे. सरकारला लोकांच्या जगण्या मरण्याचे काही घेणे देणे राहिले नाही, असा हल्लाबोल महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केला आहे.

नागपूर येथे माध्यमांशी बोलताना पटोले म्हणाले की, जून महिना संपत आला तरी अद्याप राज्याच्या अनेक भागात पाऊस पडलेला नाही. जनता भयंकर दुष्काळाचा सामना करत आहे. लोकांना प्यायला पाणी नाही जनावरांना चारा नाही.

राज्यात टँकर माफिया आणि बोगस बियाण्यांचा सुळसुळाट झाला आहे. राज्याच्या विविध भागांमध्ये उष्माघाताने अनेक लोकांचा मृत्यू झाला आहे. पण सरकार कुठे दिसत नाही. राज्य एवढ्या भयंकर परिस्थितीचा सामना करत असताना सत्ताधारी पक्षाचे मंत्री परदेशात जाऊन थंड हवा खात आहेत. राज्यात उष्माघाताने किती लोकांचा मृत्यू झाला आहे हे सरकारने जाहीर करावे. परदेशात जाण्यासाठी मंत्र्यांना केंद्र सरकारची परवानगी घ्यावी लागते या मंत्र्यांनी ती परवानगी घेतली आहे का? यांचा परदेश दौ-याचा खर्च कोण करत आहे? या प्रश्नांची उत्तरे सरकारने जनतेला दिली पाहिजेत. मुख्यमंत्र्यांचा मंत्र्यांवर आणि प्रशासनावर वचक राहिलेला नाही. लोकसभा निवडणुकीत राज्यात महायुतीच्या दारुण पराभवानंतर आपण पुन्हा सत्तेत येणार नाही. याची जाणिव झाल्यामुळे सरकारमधले लोक फक्त टेंडर काढणे, निधी वाटणे आणि कमिशन घेणे एवढे एकच काम करत आहेत. त्यांना जनतेच्या जगण्या मरण्याशी काही देणे घेणे राहिले नाही. नीट परीक्षेतील पेपरफुटीमुळे आणि निकालातील गोंधळामुळे लाखो विद्यार्थ्यांचे भविष्य अंधकारमय झाले आहे.

ठिकठिकाणी विद्यार्थी आंदोलन करत आहेत पण सरकारने अद्याप या गोष्टींची दखल घेतली नाही. राज्यातही प्रत्येक भरती परीक्षेचे पेपर फोडले जातात. बेरोजगार तरुण या गैरप्रकारांमुळे निराश झाले आहेत. काँग्रेस पक्ष आगामी अधिवेशनात या सर्व मुद्द्यांवर सरकारला धारेवर धरून जाब विचारणार आहे असे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले.

पत्रकारांनी विचारलेल्या एका प्रश्नाला उत्तर देताना नाना पटोले म्हणाले की, विधानसभा निवडणुकीच्या जागावाटपाचा कोणताही फॉम्युला ठरलेला नाही. लवकरच महाविकास आघाडीतील सर्व घटक पक्षांचे नेते एकत्र बसतील आणि विधानसभा निवडणुकीच्या जागावाटपाबाबत चर्चा होईल त्यानंतर एकत्रीत बसून मेरीटनुसार जागावाटपाचा फॉर्म्युला ठरवू.



# मोरेश्वरच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा

## शाळा परिसरात केले वृक्षारोपण; 22 वर्षानंतर वर्गमित्रांची भेट, जुन्या आठवणींना उजाळा

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीक्षेत्र राजूर :** येथील मोरेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील माजी विद्यार्थ्यांचे स्नेह मिलनाचा कार्यक्रम नुकताच पार पडला असून तब्बल बावीस वर्षांनंतर जुन्या वर्गमित्रांनी एकत्र येऊन शालेय जीवनातील आठवणींना उजाळा दिला.यावेळी आठवण म्हणून माजी विद्यार्थ्यांनी विद्यालय परिसरात वृक्षारोपण केले.शिक्षक व विद्यार्थ्यांनी जुन्या आठवणींना उजाळा देण्याचा प्रयत्न केला.

राजूर येथील मोरेश्वर विद्यालयाच्या 2002 ते 2004 या शैक्षणिक वर्षातील दहावी,बारावीचे विद्यार्थी व्हाट्सएप समूहाच्या माध्यमातून एकत्र आली.व जुन्या वर्गमित्रांना भेटण्यासाठी स्नेह मेळाव्याचे आयोजन केले.16 जून रोजी राजूर येथे गणपती मंदिर परिसरातील सभागृहात शिक्षक व माजी विद्यार्थ्यांचे एकत्रीकरण झाले. सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते राजुरेश्वराच्या प्रतिमेचे पूजन करून दीपप्रज्वलन करण्यात आले. यावेळी मंचावर शिक्षक संतोष इंगळे,प्रदीप मोहिते, तातेराव अंभोरे, दिपचंद अग्रवाल सोपान जावळे , सलीम शेख आदीजन उपस्थित होते.

विद्यार्थ्यांच्या वतीने गुरुजनांचा शाल,श्रीफळ,पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला.यावेळी शिक्षकांनी उपस्थित विद्यार्थ्यांस मोलाचे मार्गदर्शन केले.विद्यार्थ्यांनीही आपले मनोगत व्यक्त करून जुन्या आठवणींना उजाळा दिला. या कार्यक्रमात शिक्षक व वर्गमित्रांनी स्नेहभोजनाचा आनंद लुटला. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी निर्मला पुंगळे, लता साबळे, मंजूर शेख सौदागर, अॅड.संदीप दारुवाले, सोमीनाथ सोनवणे, दीपक सोनवणे, सुभाष भिडे,नारायण पुंगळे यांच्यासह सर्व वर्गमित्रांनी परिश्रम घेतले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अॅड.संदिप दारुवाले यांनी केले तर आभार गजानन जोशी यांनी मानले.




# महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या महाग्रामीण नवचेतना संवाद यात्रेचा समारोप सोहळा

आधुनिक केसरी न्यूज

**दशरथ आंबेकर**

**किनवट :** महाराष्ट्र ग्रामीण बँकेने शेतकऱ्यांचे हित जपत शेतकऱ्यांना पीक कर्जाच्या माध्यमातून कोट्यावधी रुपये कर्ज दिले, देऊन शेतकऱ्यांकडून पीक कर्ज मुद्दतीच्या आत भरून घेऊन बिनव्याजी कर्जाचा फायदा करून दिला आहे. त्याचबरोबर शासनाच्या विविध योजनेचा शेतकऱ्यांना विम्याच्या माध्यमातून फायदा मिळवून दिला आहे. त्यामुळे महाराष्ट्र ग्रामीण बँक ही काही ठीकाणी नंबर वन तर काही ठिकाणी दोन वर आहे. अशीच वाटचाल हो त्यामुळे शेतकऱ्याची बँक म्हणून ओळखली जात आहे, असे प्रतिपादन शनिवारी जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी केले ते महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या नवचेतना संवाद यात्रा भव्य समारोप व्यासपीठावरून बोलत होते.

महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या महाग्रामीण नवचेतना संवाद यात्रेचा भव्य समारंभ सोहळा नक्षत्र हॉल नांदेड येथे मुख्य अतिथी जिल्हाधिकारी अभिजीत राऊत व महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे अध्यक्ष मिलिंद घारड यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला आहे. या नवचेतना संवाद यात्रेच्या समारोप सोहळ्या प्रसंगी व्यासपीठावर महाराष्ट्र ग्रामीण बॅंकेचे अध्यक्ष मिलींद घारड, विशेष उपस्थिती सर व्यवस्थापक दत्तात्रेय कावेरी, सर व्यवस्थापक विजय मानकर,प्रमुख उपस्थिती डीडीएम नाबार्ड दिलीप दमयावार, जिल्हा उधोग केद्र महाव्यवस्थापक अमोल इगळे, महाराष्ट्र ग्रामीण बॅक चे श्रेत्रीय व्यवस्थापक संतोष प्रभावती व अनेक मान्यवर उपस्थित होते. आधुनिक काळातील फोरजी फायुजीच्या इंटरनेटच्या माध्यमातून वाढती सायबर गुन्हेगारी व ओटीपी मेसेजच्या माध्यमातून होणारी लूट ही कशी थांबवली पाहिजे त्याचबरोबर शेतकऱ्यांना विविध योजनेची माहिती नसल्यामुळे शेतकरी कसा हातबल होतो आणि कुठले तरी डोक्यात विचार आणून टोकाचे पाऊल उचलतो यासाठी शेतकऱ्यांनी कुठलेही टोकाचे पाऊल न उचलता बँकेची संपर्क साधावा अशी पथनाट्य करून संवाद यात्रेच्या माध्यमातून जनजागरण केले त्याचे प्रत्यक्ष या कार्यक्रमाप्रसंगी करून दाखवले. महिला बचत गट व शेतकऱ्यांना आर्थिक प्रबळ करून त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी शासनाच्या विविध योजना बँके अंतर्गत मोठ्या प्रमाणात राबवल्या जातात मात्र या योजनांची शेतकरी, महिला बचत गट, व्यापारी, उद्योजक व गृहकर्ज आणि इतर जनसामान्यांना या योजना ची माहिती परिपूर्ण नसते यासाठी या योजनेची परिपूर्ण माहिती करून देण्यासाठी महाराष्ट्र ग्रामीण बँकेने जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून पाच जून ते १५ जून पर्यंत विविध योजनेची माहिती पुरवण्यासाठी महाराष्ट्र ग्रामीण बँकेने सात विश्वासाची वाट विकासाची या बिद्र व्याख्या खाली एक टिम विश्वासाची आणि दुसरी टीम विकासाची अशा दोन टिमा तयार करून महाग्रामीण नव चेतना संवाद यात्रेच्या माध्यमातून मराठवाड्यातील संभाजीनगर, जालना, हिंगोली,नांदेड एक टीम इकडे पाठवण्यात आली तर दुसरी टीम संभाजीनगर, बीड, धाराशिव या मार्गे मार्गक्रमण करून नांदेड येथे पोहोचली असता महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या महाग्रामीण नवचेतना संवाद यात्रेचा समारोप आज नांदेड येथे संपन्न झाला. नांदेड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांच्या हस्ते यात्रेचा समारोप करण्यात आला. यावेळी महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे अध्यक्ष मिलिंद घारड हे अध्यक्षस्थानी होते तर बँकेचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते पाच जून रोजी छत्रपती संभाजीनगर येथून या यात्रेला सुरुवात झाली होती मराठवाड्यातील सर्वच जिल्ह्यातूनही यात्रा काढण्यात आली.

दरम्यान बँकेच्या आणि शासनाच्या योजना ची माहिती अनेकांना नसते ही माहिती घ्यावी या उद्देशानेही यात्रा मराठवाड्यातून काढण्यात आली बँकेमार्फत शेतकरी, महिला बचत गट, व्यापारी, उद्योजक, व्यावसायिक, गृह असे कर्ज वाटप केले जाते या समारोप कार्यक्रमाला बँकेचे अधिकारी कर्मचारी आणि ग्राहक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी अभिजीत राऊत बोलताना म्हणाले की महाराष्ट्र ग्रामीण बँक ही शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी ही बँक महत्त्वाची ठरली असुन आता ही बँक शेतकऱ्यांची बँक म्हणून ओळखली जात आहे असे ते यावेळी बोलत होते. त्याचबरोबर जे शेतकरी नियमित कर्ज परतफेड करतात अशा शेतकऱ्यांचा जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या महा ग्रामीण नवचेतना संवाद यात्रा भव्यसमारप सोहळ्याला मराठवाड्यातून महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे कर्ज दार शेतकरी, महीला बचत गट,अधिकारी, कर्मचारी, महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे ग्राहक सेवा केंद्र चालक गणेश जयस्वालसह अनेक बी. सी. उपस्थित होते.

# नागपुरात ३१ लाखांची एमडी पावडर जप्त

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** उपराजधानीतील युवा वर्ग पुन्हा ड्रग्सच्या आहारी जात असून महिन्याकाठी लाखों रुपयांचे ड्रग्स नागपुरात येत आहेत. ड्रग्स तस्करांनी नागपुरातून संपूर्ण विदर्भात जाळे पसरवले असून तरुण-तरुणींना पब, बार आणि हुक्का पार्लरच्या माध्यमातून ड्रग्स पोहचविण्यात येत आहे. गुन्हे शाखेच्या पोलिसांनी ३१ लाखांची एमडी पावडर शहरातील लहान विक्रेत्यांपर्यंत पोहोचविण्यापूर्वीच जप्त केली व आरोपींच्या मुसक्या आवळल्या. गुन्हे शाखेच्या अमली पदार्थविरोधी पथकाने मध्यरात्री महेंद्र नगरातील अझरुद्दीनच्या घराची झडती घेत ३२ लाखांचा मुद्देमाल जप्त केला. एकापाठोपाठ चार आरोपींना अटक करण्यात आली. अझरुद्दीन काझी (३७) रा. महिंद्रनगर, इरफान अहमद (२१) रा. टिमकी, नदीम खान (२४) रा. शांतीनगर आणि सय्यद सोहेल रा. नवी वस्ती टेका अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत.

# लोणी बुद्रुक परिसरात खरीप पेरणीला प्रारंभ

## बैलांची जागा व्यापली ट्रॅक्टरने

आधुनिक केसरी न्यूज

**विनोद पाटील बोडखे**

**रिसोड :** तालुक्यातील श्री क्षेत्र लोणी बुद्रुक तसेच परिसरातील शेतकऱ्यांनी आज दिनाक 15 जून रोजी दुपारनंतर खरीप हंगामातील पिकांच्या पेरणीला सुरुवात केली आहे. दिनाक 13 जून च्या मध्यरात्री वादळी वाऱ्यासह आलेल्या मुसळधार पावसामुळे नदी नाले एक झाल्याने पेरणीयोग्य ओल देखील जमिनीत असल्याने मोप महसूल मंडळाअंतर्गत येत असलेल्या लोणी बुद्रुक,लोणी खुर्द आदी गावांमध्ये शेतकऱ्यांनी खरीपातील मुख्य पिक असलेल्या सोयाबीन,तूर या पिकांच्या पेरणीला प्रारंभ केला आहे. तस् पाहल तर एककाळी कॉटन बेल्ट म्हणून प्रसिद्ध असलेला वाशिम जिल्हा आज सोयाबीन हब झाला आहे. तसेही रिसोड तालुक्यातील पेन काठावरील काही गावे सोडली तर तसा जिरायती शेतीच जास्त असल्याने रब्बी हंगामातील पिके पाहिजे त्या प्रमाणात या भागात उत्पादन देत नसल्याने शेतकऱ्यांची सारी भिस्त ही मुख्यतः खरीप सोयाबीन, तूर या पिकांवर अवलंबून असते.मागील तीन वर्षांपासून शेतकरी सततचा विदर्भातील दुष्काळ, नापिकी, तर कधी अवकाळी ने तोंडचा आलेला घास हिरावला अश्या विविध समस्यांमुळे त्रस्त झाला होता. मात्र यावर्षी पेरणी तर वेळेत होतेय आणि प्रथमतः निसर्ग देखील चांगली साथ देत पाऊस चांगला असल्याने उत्पादन ही चांगले येईल अशी अपेक्षा परिसरातील शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. शेतकऱ्याच्या डोईवरील कर्जाचा डोंगर या वर्षी मात्र नक्कीच हलका होऊन साऱ्या जगाचा पोशिंदा असलेला शेतकरी निश्चितच सुखी, समाधानी सुजलाम सुफलाम होईल अशी अपेक्षा व्यक्त करत आहेत.



या वर्षी गत वर्षीच्या तुलनेत लवकर म्हणजेच मृग नक्षत्रात खरीप हंगामातील पिकांची पेरणी होत असल्याने सोयाबीन, तूर, उडीद , मूग, सर्वच पिकांसाठी पोषक वातावरण आहे . त्यातच वरून राज्याने सुरुवात देखील चांगली केली आहे . त्यामुळे निश्चितच मागील तीन वर्षांपासून रिसोड तालुक्यात सतत दुष्काळ, नापिकी, तर कधी अवकाळी ने तोंडचा घास हिरावला यावर्षी मात्र अपेक्षित उत्पादन होऊन एका दाण्याचे शेकडो दाने करणार बळीराजा सुजलाम सुफलाम होईल .
**गणेश बोडखे, प्रगतशील शेतकरी लोणी बुद्रुक**



# विधानसभा संपर्क प्रमुखांनी घेतला कंधार-लोहा विधानसभेचा आढावा

## आगामी निवडणुकीसाठी सतर्क राहण्याचा दिला कानमंत्र

आधुनिक केसरी न्यूज

**धोंडीबा मुंडे**

**कंधार :** अपेक्षेप्रमाणे नांदेड जिल्ह्यातील दोन्ही लोकसभा मतदारसंघातून महाविकास आघाडीचे उमेदवार निवडून आले आहेत.त्याच धर्तीवर महाविकास आघाडीतील घटक पक्ष कंधार-लोहा विधानसभेवर आपल्या पक्षाला उमेदवारी मिळावी यासाठी दावा करत आहे. याच अनुषंगाने शिवसेनेचे कंधार लोहा विधानसभा संपर्कप्रमुख आशिष आसगावकर यांनी दि.१५जुन रोजी कंधार येथे शिवसेनेच्या सिंहगड जनसंपर्क कार्यालय कंधार. येथे शिवसैनिकाची बैठक घेऊन, आगामी विधानसभा निवडणुकीच्या पूर्वतयारीची आढावा बैठक घेतली.

लातूर लोकसभा मतदार संघात कंधार-लोहा विधानसभेचा समावेश करण्यात आलेला असून लातूर लोकसभेला महाविकास आघाडीचे डॉ. शिवाजी काळगे हे मताधिक्याने निवडून आल्याने महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांबरोबरच शिवसैनिकात नवचैतन्य निर्माण झाले आहे. आगामी विधानसभेच्या निवडणुकीच्या अनुषंगाने शिवसेनेचे विधानसभा संपर्कप्रमुख आशिष आसगावकर कंधार येथे शिवसैनिकांसोबत चर्चा करून, निवडणुकीच्या पूर्वतयारीची आढावा बैठक घेतली. तालुक्यातील सर्व उप-तालुकाप्रमुख, सर्कल प्रमुख, गणप्रमुख, बूथ प्रमुख यांच्या नेमणुका झाल्यात की नाही. यांचा तपशील घेतला. विधानसभेच्या निवडणुकीसाठी कोण कोण उमेदवार इच्छुक आहेत, असल्यास त्यांचा जनसंपर्क कसा आहे,गाव तिथे शिवसेना आणि शाखाप्रमुख नियुक्त झाले आहेत का, अशा विविध मुद्द्यावर शिवसैनिकासोबत चर्चा करुन आढावा घेतला. यावेळी शिवसैनिकांनी प्रत्येक विषयावर आपले मत मांडून. लेखी अहवाल विधानसभा संपर्कप्रमुख आशिष गावकर यांच्याकडे सादर केला.

यावेळी विधानसभा संघटक गणेश कुंटेवार, तालुकाप्रमुख परमेश्वर जाधव, माजी सभापती तालुका संघटक पंडित देवकांबळे, पंचायत समिती सदस्य तालुका समन्वयक उत्तम चव्हाण, किसान सेना तालुकाप्रमुख शिवाजी कदम, उपतालुकाप्रमुख दादाराव शिंदे, जेष्ठ शिवसैनिक आत्माराम पाटील लाडेकर, शिवदूत नामदेव गांगतिरे, युवासेनेचे निरंजन वाघमारे, राहुल शिंदे, संतोष पाटील घोरबांड, सर्कल प्रमूख रोहीदास शिरढोने, रमाकांत देवणे, अच्युत मेटकर, जीएम पवळे, जळबा पाटील शिंदे, केदारनाथ देवकांबळे, निरंजन वाघमारे, बाबु पाटिल शिंदे, लक्ष्मण कटवाड याबरोबर अनेक शिवसैनिक उपस्थित होते.

# मनोकामना पूर्ण करणाऱ्या साईबाबांना ४३ लाखांचा सोन्याचा मुकूट दान

आधुनिक केसरी न्यूज

**शिर्डी :** भारतात बालाजी नंतर दुसऱ्या क्रमांकाचे देवस्थान म्हणून ओळखल्या जाणाऱ्या व मोठा नावलौकिक असलेल्या व साईभक्त भाविकांची मनोकामना पूर्ण करणाऱ्या श्री साईबाबांवर देश विदेशातील लाखो भाविकांची श्रद्धा असल्याने भाविक साईबाबांच्या झोळीत भरभरून दान देत असतात. आज एका साईभक्ताने ४३ लाख रुपये किंमतीचा साईचरणी ६४८ ग्रॅम वजनाचा सोन्याचा मुकुट अर्पण केला असल्याची माहिती श्री साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी दिली.



या सोनेरी मुकूटाची किंमत ४२ लाख ८० हजार रुपये असून सकाळी शिर्डी माझे पंढरपूर या आरतीला हा सुंदर नक्षिकाम असलेला आकर्षक व मनमोहक दिसणारा सुवर्णजडीत मुकुट साईबाबांच्या मुर्तीवर चढवण्यात आला. मुर्तीवर चढवलेला हा मुकुट अतिशय सुंदर असून दानशुर साईभक्ताने संस्थानला दान स्वरूपात दिला असून आपले नाव जाहीर न करण्याची विनंती करत हे गुप्त दान असल्याचे सांगितले आहे. दिवसेंदिवस दानराशी वाढत असताना सुवर्ण अलंकार दागदागिने हिरे हार मुकुट अशा प्रकारचे सुवर्ण अलंकार असलेले दागदागिने दान स्वरूपात येत असून यात अनेक दानशूर दान करताना दान गुप्त दान स्वरूपात दान देताना नाव गुप्त ठेवण्याची काळजी देखील साईभक्त घेत आहेत साईबाबा संस्थान येणाऱ्या दानातुन मोफत भोजनालय हजारो साईभक्त भाविकांना निवास सुविधा त्या बरोबरच शैक्षणिक सुविधा तसेच हजारो रुग्णांना साईबाबा संस्थान व साईनाथ रुग्णालयाच्या माध्यमातून सेवा देत असुन वर्षाकाठी काही कोटी भाविक साईबाबा मंदिराला भेट देत असुन त्याच्या सेवेसाठी हजारो हात २४तास अविरत सेवा देण्यासाठी योगदान देत आहे त्रिसदस्यीय समितीचे अध्यक्ष यार्लागड्डा जिल्हा अधिकारी सिध्दाराम सालीमठ मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर उपकार्यकारी अधिकारी तुकाराम हुलवळे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे

# बसची ऑटोरिक्षाला धडक, दोन जवान ठार

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** कन्हान नदीवरील पुलावर एका भरधाव खासगी बसने विरुद्ध दिशेने येणाऱ्या ऑटोरिक्षाला धडक दिल्याने झालेल्या भीषण अपघातात कामठी लष्करी छावणीतील (कँटोन्मेंट बोर्ड) दोन जवानांचा मृत्यू झाला, तर सहा जवानांसह ऑटोरिक्षाचालक गंभीर जखमी झाला. जखमींवर मेयो, मेडिकलसह लष्करी छावणीच्या रुग्णालयात उपचार सुरू आहे. रविवारी सायंकाळच्या सुमारास ही घटना घडली. जी. विघ्नेश (३०) आणि धीरज रॉय, अशी अपघातात ठार झालेल्या जवानांची नावे आहेत, तर कुमार पी., शेखर जाधव, पूमुरगन बी., अरविंद कुमार, डी. प्रधान, नागा रथीनम एम. अशी जखमी जवानांची नावे असून शंकर विठूलाल खरागबान हा ऑटोरिक्षाचालकही गंभीर जखमी आहे. लष्करी छावणीतील आठ जवान रविवारी सुट्टी असल्यामुळे लगतच्या कन्हान शहरात खरेदीसाठी दोन ऑटोरिक्षाने गेले होते. खरेदी आटोपल्यावर सायंकाळी पाच वाजताच्या सुमारास ते ऑटोरिक्षाने (एमएच४९एआर ७४३३) परत येत होते. यादरम्यान जुनी कामठी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कन्हान नदीच्या पुलावर भरधाव खासगी बसने (एमएच ३१ एफसी-४१५८) या ऑटोरिक्षांना धडक दिली. यात एका ऑटोरिक्षाचा चुराडा झाला. त्या ऑटोरिक्षातील कुमार पी., शेखर जाधव, पूमुरगन बी., अरविंद कुमार, डी. प्रधान, नागा रथीनम एम., धीरज रॉय आणि विघ्नेश जी. यांच्यासह चालक शंकर खरागबान हे गंभीर जखमी झाले.



# आत्मा योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना तूर बियाणे वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील नांदा गाव येथे कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा आत्मा अंतर्गत नांदागाव येथे स्थापन करण्यात आलेल्या नांदागाव नैसर्गिक शेती गटातील ५० शेतकरी यांना ५० एकर क्षेत्रासाठी खरीप हंगामासाठी तूर (वाण - गोदावरी) बियाण्याचे वाटप आज रोजी कृषी विभाग व आत्मा योजना यांचे मार्फत वाटप करण्यात आले. सदरील प्रकल्पात प्रती शेतकरी माती नमुना तपासणी, ६ किलो बियाणे व रायझोबियम २५० ग्रम या प्रमाणे निविष्ठा मा. तालुका कृषी अधिकारी सोयगाव तथा मंडळ कृषी अधिकारी फर्दापूर रमेश गुंडीले व अतुल पाटील कृषी पर्यवेक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली व अमोल महाजन तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक सोयगाव व अर्जुन सुरळकर कृषी सहाय्यक नांदातांडा यांच्या उपस्थितीत वाटप करण्यात आले.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# नर्सिंग अभ्यासक्रम एएनएम, जीएनएमला प्रवेश घेणाऱ्या व्हीजीएनटी ओबीसी, एसबीसी विद्यार्थ्यांना मिळणार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती

## महाडिबीटी प्रणालीवर मॅपिंग करण्यास राज्य शासनाची मान्यता

आधुनिक केसरी न्यूज

**साईनाथ हामदे**

**उमरी :** ओबीसी, एनटी, एसबीसी प्रवर्गातील नर्सिंग अभ्यासक्रमाला म्हणजे एएन एम व जीएनएम प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना आता अभ्यासक्रमांसाठी शिष्यवृत्ती मिळण्यासाठीचा मार्ग मोकळा झाला आहे. सामाजिक न्याय विभागांमार्फत महाडिबीटी प्रणालीवर मॅपिंग झालेले अभ्यासक्रम विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्गास लागू असणाऱ्या शिष्यवृत्ती योजनेस महाडिबीटी प्रणालीवर मॅपिंग करण्यास मान्यता देण्यात आली आहे. राज्याच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागाने यासंदर्भातील शासननिर्णय जाहीर केला आहे. शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागातून इतर मागास बहुजन कल्याण विभाग हा वेगळा विभाग नव्याने निर्माण झाला आहे. सामाजिक न्याय विभागामार्फत अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरिता राबविण्यात येणाऱ्या मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीच्या बहुतांश योजना इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत विमुक्त जाती भटक्या जाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरिता राबविण्यात येतात. परंतु, या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती मिळण्यासाठी अनुज्ञेय अभ्यासक्रमांचे मॅपिंग केले नसल्याने या प्रवर्गातील विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहत होते. सामाजिक न्याय विभागाप्रमाणे मॅट्रिकोत्तर अभ्यासक्रमांसाठी शिष्यवृत्ती मिळण्यासाठी अभ्यासक्रम मॅपिंग होण्याकरिता विविध स्तरावरून मागणी होत होती. याच अनुषंगाने काही न्यायालयीन प्रकरणे देखील उद्भवली होती. याच पार्श्वभूमीवर इतर मागास बहुजन कल्याण संचालनाल संचालकांच्या अध्यक्षतेखालील समितीने सामाजिक न्याय विभागामार्फत मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीकरिता मॅप झालेल्या झालेले अभ्यासक्रम हे इतर मागास बहुजन कल्याण विभागांतील इमाव, विजाभज व विमाप्र प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीच्या योजनासाठी महानिबीटी प्रणालीवर मॅचिंग करण्याबाबत शिफारस केली होती. त्यानुसार सामाजिक न्याय विभागाप्रमाणेच इतर मागास बहुजन कल्याण विभागांतर्गत मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीसाठी अभ्यासक्रमांचे मॅपिंग करण्याबाबतचा प्रस्ताव उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडे सहमतीसाठी सादर करण्यात आला. तसेच वैद्यकीय शिक्षण विभागाकडेही शिष्यवृत्ती देण्याबाबत याबाबत विचारणा केली गेली होती त्याला वैद्यकीय शिक्षण विभागाने हिरवा कंदील दाखवल्यामुळे इ.मा.ब.क विभागाने विभाग स्तरावर उचित निर्णय घ्यावा असे अभिप्राय प्राप्त झाला होता.

**विद्यार्थ्यांना होणार फायदा :** शासनाच्या सामाजिक न्याय विमागाकडील महाडिबीटी प्रणालीवर मॅट्रिकोत्तर अभ्यासक्रमांकरिता प्रवेशित विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजनेतर्गत मॅप झालेल्या अभ्यासक्रमांमधील द्विरुक्ती झालेले अभ्यासक्रम तसेच औद्योगिक प्रशिक्षण संस्थां ( आयटीआय ) मधील अभ्यासक्रम वगळता इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत विमुका जाती मटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग या घटकांतील विद्यार्थ्यांच्या मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती व परीक्षा शुल्क, शिक्षण शुल्क, निर्वाह भत्ता यांकरिता अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून महाडिबीटी प्रणालीवर मॅप करण्यास मान्यता देण्यात आली आहे. मॅट्रिकोत्तर अभ्यासक्रमांसाठी सन २०२३-२४ मध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती, शिक्षण फी, परीक्षा फी, निर्वाह भता प्रतिपूर्ती लागू असेल.
नर्सिंगच्या कोर्सला प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना होणार लाभ. गेल्या 10 वर्षांपासून ओबीसी, एन.टी. एसबीसी प्रवर्गातील विद्यार्थी एएनएम आणि जीएनएम नर्सिंग या व्यावसायिक अभ्यासक्रमांपासून केवळ फिस भरणे शक्य नसल्याने शिष्यवृत्तीअभावी वंचित होते. या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळावी यासाठी खासगी नर्सिंग स्कूल मॅनेजमेंट असोसिएशनचे राज्याचे अध्यक्ष डॉ. बाळासाहेब पवार, राज्याचे समन्वयक डॉ राहुल जवंजाळ सचिव शंकरराव आडसुळ खजिनदार विनोद गायकवाड तसेच राज्यातील असोसिएशनचे सर्व पदाधिकारी सचिन देसाई राष्ट्रपाल वैद्य किशोर चौधरी जयंत नायकुडे तसेच नर्सिंग कौन्सिल चे अध्यक्ष मा डॉ रामलिंग माळी नुकतेच खासदार झालेले धैर्यशील मोहिते पाटील असोसिएशनचे एडवोकेट चंद्रकांत जाधव यांनी वेळोवेळी शासनस्तरावर लक्षवेधी पत्रव्यवहार व बैठका घेऊन पाठपुरावा केला. अखेर या पाठपुराव्यास यश मिळाले असून शासनाने मॅपींग करण्यास मान्यता दिलेल्या अभ्यासक्रमांमध्ये एएनएम, जीएनएम नर्सिंगचा समावेश आहे. या निर्णयामुळे या क्षेत्रात या प्रवर्गातील विद्यार्थ्यांचा कमी झालेला टक्का शिष्यवृत्तीच्या माध्यमातून वाढण्यास मदत होणार आहे.






# निवडणूक शांततेत; व्यापारी महासंघाने मानले जिल्हाधिकाऱ्यांचे आभार

आधुनिक केसरी न्यूज

**जालना :** लोकसभा निवडणूक कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडल्याबाबत तसेच लोकशाहीच्या सशक्तीकरणासाठी कुशल प्रयत्नाने मतदानाची टक्केवारी वाढवल्याबद्दल जालना व्यापारी महासंघाचे अध्यक्ष सतीश पंच यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्णनाथ पांचाळ यांचे अभिनंदन करून आभार व्यक्त केले.

यावेळी सतीश पंच म्हणाले की, जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ यांनी आपल्या कुशल नेतृत्वाने व अनुभवाने जालना लोकसभा मतदार संघाचा निवडणूक कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडला तसेच मतदान केंद्रावर सोईसुविधा उपलब्ध करून मतदानाची टक्केवारी वाढविली. कामकाजाचे उत्कृष्ट नियोजन केल्यामुळे जालना शहराच्या मतदानात 8 टक्के तर जिल्ह्याच्या मतदानात 4 टक्के वाढ झाली आहे. जालना जिल्हा प्रशासनाच्या या राष्ट्रीय कार्यास जालना व्यापारी महासंघाचे ही सहकार्य राहिले आहे. आगामी 4-5 महिन्यात महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुका होत आहेत. या निवडणुकीतही मतदानाची टक्केवारी वाढण्यासाठी, नवीन मतदार वाढविणे, निवडणुकीचे कामकाजात सुसुत्रता आणण्यासाठी व्यापारी महासंघ, जालना जिल्हा व्यापारी महासंघाचा ग्रामीण विभाग, विविध क्लब, सामाजिक संस्था सहकार्य करण्यास तयार आहे. आपण आम्हास जी जबाबदारी द्याल ती आम्ही यशस्वीरित्या पुर्ण करूत याची खात्री यावेळी जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आली. दरम्यान, जालन्यात व्यापाऱ्यांची रोकड पळविण्याच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याची माहिती जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ यांना देऊन अशा घटनांना आळा घालण्यासाठी प्रयत्न करावेत, अशी विनंती सतीश पंच यांनी केली.

याप्रसंगी दीपक भुरेवाल, जालना जिल्हा व्यापारी महासंघाच्या ग्रामीण विभागाचे अध्यक्ष हत्तीमल बंब, अनिल पंच, कपिल चावला, पियुष भक्कड, राजेश गडगिळे, गणेश उबाळे, गौरव नवपुते, राजेंद्र लोहिया, वसीमभाई, उगमराज धोका, संजय लव्हाडे, अमित अग्रवाल, अखिलभाई, किशन भक्कड उपस्थित होते.

**व्यापारी महासंघाचे राष्ट्रीय कार्यात सदैव सहकार्य-पंच**
मतदान जनजागृती असो की मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी अभियान असो, कोणत्या राष्ट्रीय कार्यात जालना व्यापारी महासंघाचे जिल्हा प्रशासनाला सदैव सहकार्य असते. आगामी विधानसभा निवडणुकीतही मतदानाची टक्केवारी व्यापारी महासंघ प्रशासनाच्या खांद्याला खांदा लावून आवश्यक ते सहकार्य करेल, अशी ग्वाही यावेळी अध्यक्ष सतीश पंच यांनी जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्णनाथ पांचाळ यांना दिली.

# नागपुरात महाविद्यालयीन तरुणी देहव्यापारात

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** गेल्या काही महिन्यांपासून शहरात देहव्यापाराचे अड्डे वाढले असून अल्पवयीन मुलींसह महाविद्यालयीन तरुणी झटपट पैसा कमावण्याच्या नादात या दलदलीत अडकू लागल्या आहेत. गुन्हे शाखेने रविवारी दोन देहव्यापाराच्या अड्ड्यांवर घातलेल्या छाप्यातून ही बाब उघड झाली. सदरमधील छावणी भागातील एका सलूनच्या आड सुरू असलेल्या देहविक्री अड्ड्यावर पोलिसांनी छापा घातला. तेथून चार तरुणींची सुटका करण्यात आली. याप्रकरणी पोलिसांनी सलून चालक महिलेसह दोन ग्राहक, अशा पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला. साक्षी ऊर्फ मनीषा चंद्राहास तुपे (३०, रा. उर्वेला कॉलोनी, वर्धा रोड), राकेश साबुलाल बंदेवार ऊर्फ राज ठाकूर (३३, रा. उज्ज्वलनगर, सोमलवाडा), अभिषेक प्रभाकर माहुरे (३२, रा. प्लॉट नं. ८९ मनीषनगर), मोहन भगवंतराव सुरकर (४०, रा. निलडोह, हिंगणा) व राजेंद्र चिंतमणराव पांडे (५२, रा. वानाडोंगरी, हिंगणा), अशी आरोपींची नावे आहेत.

# भरधाव कारने पदपथावर झोपलेल्यांना चिरडले

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** एका भरधाव कारने पदपथावर झोपलेल्या नऊ जणांना चिरडले. या अपघातात दोघांचा जागीच मृत्यू झाला तर सात जण गंभीर जखमी असून त्यांच्यावर मेडिकल रुग्णालयात उपचार सुरू आहेत. हा अपघाताचा थरार रविवारी मध्यरात्री साडेबारा वाजताच्या सुमारास वाठोडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत दिघोरी टोल नाक्याजवळ झाला.
याप्रकरणी कारच्या चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करून अटक करण्यात आली. कांतीबाई गजुड बागडिया (४२, करवली, बुंदी- राजस्थान) आणि सीताराम बाबुलाल बागडिया (३०) अशी अपघातात ठार झालेल्यांची नावे आहेत. तर कविता बागडिया, सुमन बागडिया, सीना बागडिया, सकीना बागडिया, संमद खजूर बागडिया, बुरा हनुमान बागडिया, पानबाई मानसिंग बागडीया अशी जखमींची नावे आहेत.
एक भरधाव कार रविवारी मध्यरात्री साडेबारानंतर उमरेड रोडने नागपुरात येत होती. टोल नाक्यासमोरून जात असताना भरधाव कारवरील चालकाचे नियंत्रण सुटले, त्यामुळे ती कार रस्त्याच्या लगत असलेल्या पदपथावर चढली. या पदपाथावर मातीची भांडी विकणारे बंजारा कुटुंब झोपलेले होते. या कुटुंबात तीन महिला, चार मुले आणि एक पुरुष असे नऊ जण पदपाथावर झोपले होते. या नऊ जणांच्या अंगावरून कार गेली.

